# शासन सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा

भाग ११

**शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वाढविणेबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१९/२००४/१२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ ऑगस्ट,२००४.

पहा :- शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/प्र.क्र२४/९२/१२, दि.२८ ऑक्टोबर,१९९२

**शासन निर्णय** :-शासन निर्णयक्रमांक-एसआरव्ही-१०९२/प्र.क्र२४/९२/१२,दि.२८/१०/१९९२ अन्वये शासन सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर नियुक्तीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३० वर्षे व मागासवर्गीयासाठी ३५ वर्षे कमाल वयोमर्यादा विहित करण्यात आलेली आहे. सदरहू विहित वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत सर्वंकष विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर नियुक्तीसाठी सध्या असलेल्या कमाल वयोमर्यादेत ३ वर्षांनी वाढ करण्यात यावी. यापुढे शासन सेवेतील गट-अ ते ड मधील सर्व पदांवर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयासाठी ३८ वर्षे अशी राहील. सदर कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध मंत्रालयीन विभागांनी/विभाग प्रमुखांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदासाठीच्या स्पर्धा परिक्षेसाठीही लागू असेल.

२. मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भात संबंधित सेवाप्रवेश नियमात वरील बदल अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशाप्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीतील नेमणुका देखील या वाढीव वयोमर्यादेनुसार कराव्यात.

३. ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वरील सुधारीत वयोमर्यादेपेक्षा विविक्षित कारणास्तव जास्त किंवा कमी विहीत केली असेल तर त्या पदांच्या बाबतीत हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बा. बा. नारायणकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

# संगणक हाताळणी प्रमाणपत्र

भाग

१२

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी १९९९

25

भारताचे संविधान.

क्रमांक सेप्रनि. १०९८/प्र.क्र.-७/९८/१२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे शासन सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क या पदांवर नियुक्तीकरिता आवश्यक ठरविण्यात आलेल्या अर्हतांपैकी एक अट म्हणून "संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान विहित करण्याबाबत विनियम" करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. **संक्षिप्त शीर्षक.**—(अ) या नियमांना "महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९" असे संबोधण्यात यावे.

(ब) सदरहू नियम, यानंतर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) "**प्रमाणपत्र**" म्हणजे संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्यताप्राप्त प्रमाणपत्र ;

(ब) "**शासन**" म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. **संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता.**—शासनाच्या विभाग/कार्यालयातील गट-अ, गट-ब व गट-क मधील पदांवर नियुक्ती करण्यासंबंधात अस्तित्वात असलेले नियम, आदेश किंवा अनुदेश यामध्ये काही तरतूद नसेल तर, शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान, शासन सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क या पदांवर नियुक्तीकरिता एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल (सदर नियम अस्तित्वात येण्यापूर्वी निवड प्रक्रिया चालू झाली असेल, अशा नियुक्त्या वगळून) :

परंतु, एकाच गटातील विविध संवर्गातील पदांकरिता भिन्नभिन्न दर्जाचे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान शासन निश्चित करू शकेल.

४. **प्रमाणपत्र सादर करण्याचा कालावधी.**—प्रत्येक व्यक्ती.—

(अ) जी, सदर नियम अस्तित्वात आल्याच्या दिनांकास, शासन सेवेतील गट-अ किंवा गट-ब किंवा गट-क पद धारण करीत असेल, तिने सदर नियम अस्तित्वात आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल ;

(ब) जिची शासन सेवेतील गट-अ, गट-ब किंवा गट-क यांपैकी कोणत्याही पदी, सदर नियम अस्तित्वात आल्यानंतर नियुक्ती झाली असेल व त्याबाबतची निवड प्रक्रिया, सदर नियम अस्तित्वात येण्यापूर्वी चालू झाली असेल, अशा व्यक्तीने तिच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

५. प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट.—सदरहू नियम अस्तित्वात आल्याच्या दिनांकास, वयाची ५५ वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल.

६. या नियमातील तरतुदी शिथिल करण्याचे अधिकार.—उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या परिस्थितीत न्याय्य आणि योग्य अशा कारणासाठी या नियमातील कोणतीही अट शासन शिथिल करू शकेल आणि अशा शिथिलीकरणाचे कारण अभिलिखित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नवीन कुमार,
शासनाचे प्रधान सचिव (सेवा).

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 25th January 1999

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV. 1098/C.R.-7/98/XII.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules prescribing knowledge of Operation of Computer as one of the essential qualifications for recruitment to Groups A, B and C posts in Government Departments, namely :—

1. *Short title and commencement.*—(*a*) These rules may be called the Maharashtra Civil Services (Requirement of Knowledge of Computer Operation) Rules, 1999 ;

(*b*) They shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

2. *Definitions.*—In these rules, unless the context otherwise requires—

(*a*) " Certificate " means a certificate in Computer Operation recognised by the Government; and

(*b*) " Government " means the Government of Maharashtra.

3. *Necessity of Knowledge of Computer Operation.*—Notwithstanding anything contained in any rules regulating recruitment to Groups A, B and C posts in Government Departments, offices, or any orders or instruments made in that behalf, the knowledge of Computer Operation of the level specified by the Government by order, issued from time to time, in this behalf, shall be an additional essential qualification for appointment to any Group A, Group B or Group C post in any Government Department (excluding appointments made after the date of commencement of these rulse on the basis of the selection process started before such commencement date):

Provided that different levels of knowledge of computer operation may be specified by the Government for different cadres in a group.

4. *Period of submission of Certificate.*—Every person,—

(*a*) who is holding, on the date of commencement of these rules, any Group A, Group B or Group C post in any Government Department shall submit a certificate within a period of two years from such commencement date ;

(*b*) who is appointed to any Group A, Group B or Group C post in any Government Department, after the commencement of these rules as a result of the selection process started before such commencement date, shall submit a certificate within a period of two years from the date of his appointment.

5. *Exemption from producing the certificate.*—Every Government servant who has attained the age of 55 years on the date of commencement of these rules, shall be exempted from producing the certificate.

6. *Power to relax the provisions of these rules.*—Notwithstanding anything contained in these rules, Government may relax provisions of any of these rules, under such circumstances in such manner as shall appear it to be just and reasonable and shall record the reasons for any such relaxation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NAVIN KUMAR,
Principal Secretary (Personnel) to
Government.

**शासन सेवेतील विविध पदांवरील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/बारा,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ३२,**
**दिनांक -३ मे,२०००**

वाचा :- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/बारा, दि.२५ जानेवारी,१९९९,
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०९८/प्र.क्र.१३४/९८/३९, दि.३ मार्च,१९९९,
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीओएम-१०९८/प्र.क्र.१३४/९८/३९, दिनांक १ एप्रिल,१९९९,
४) शासनअधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/बारा, दि.३ मे.२०००.

**शासन परिपत्रक**

शासन सेवेतील गट 'अ', गट 'ब' व गट 'क' संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी संगणक हाताळणे/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबतची अधिसूचना दि.२५ जानेवारी,१९९९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेमधील नियम क्रमांक -३ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, शासन सेवेतील विविध पदांकरीता संगणक हाताळणी /वापराबाबतच्या ज्ञानासंदर्भात कोणता अभ्यासक्रम आवश्यक ठरविण्यात यावा, याबाबत वेळोवेळी आदेश काढून शासन निर्णय घेईल.

२. त्याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, शासन सेवेतील गट 'अ', गट 'ब' व गट 'क' संवर्गातील विविध पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, संबंधित पदांवर नियुक्तीकरीता संगणकविषयक ज्ञानासंदर्भातील कोणता अभ्यासक्रम विहित करावा, याबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांनी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या सहमतीने निर्णय घेऊन आदेश निर्गमित करावेत व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील पदांच्या बाबतीत,असे आदेश निर्गमित करण्यापूर्वी त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्वानुमती घेण्यात यावी.

३. संदर्भाधीन दिनांक ३ मे, २००० च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम,१९९९ या नियमांना दिनांक १ जानेवारी, २००१ पासून प्रभाव देण्यात आला आहे. ही बाब तसेच संगणकीय प्रमाणपत्र सादर करण्याकरीता अधिसूचनेमध्ये नमूद केलेली कालमर्यादा विचारात घेता, सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती की, त्यांनी वरील परिच्छेद क्रमांक-२ नुसार आवश्यक ती कार्यवाही दि. ३० जून, २००० पूर्वी पूर्ण करावी अन्यथा त्याबाबत उद्भवणाऱ्या प्रशासकीय तसेच कायदेशीर प्रकरणांची संपूर्ण जबाबदारी संबंधित मंत्रालयीन विभागाची राहील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना संगणक प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट प्राप्त होण्यासाठी वयोमर्यादा .....**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
**शासन निर्णय, क्रमांक : सेप्रनि- २००२/प्र.क्र.१४/०२/१२,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : **१ सप्टेंबर, २००३**

**वाचा:-** शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक : सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/१२, दि.२५.१.१९९९.

**शासन निर्णय**

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक :सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/१२, दि.२५.१.१९९९ अन्वये शासकीय सेवेतील गट "अ", "ब" आणि "क" मधील अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान प्राप्त करुन विहित प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. तथापि, वयाचे ५५ वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास असे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. सदर वयोमर्यादेत बदल/सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत सर्वंकष विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सध्या शासन सेवेत असलेल्या गट "अ", "ब" आणि "क" मधील वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल.

२. सदरहू निर्णयानुसार दि.२५.१.१९९९ च्या अधिसूचनेत आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

**( बा. बा. नारायणकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखन परीक्षा

भाग

१३

इंग्रजी लघुलेखक [ निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी ] व इंग्रजी टंकलेखक यांना मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक-टंलप्र-१०८ /सीआर-३४५/२०-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ मे, १९९१.

## निर्णय

शासकीय कर्मचा-यांकरिता मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजना शासनाने कार्यान्वित केली होती व स्वतंत्र मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्यात येत होते. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की अशी प्रोत्साहनात्मक बक्षीसे देऊन देखील इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक यांचेकडून पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. यास्तव या बाबतीतील सध्याचे सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखक [ निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी ] व इंग्रजी टंकलेखक यांनी प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन अर्हतेबाबतची नियमावली भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ च्या परंतुकान्वये अधिसूचनेच्या स्वरुपात राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. त्यानुसार सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे व प्रसिध्द केल्यानंतर आवश्यक त्या प्रती सर्व संबंधितांना शासन मुद्रणालय व लेखनसामग्री यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. प. आम्बेरकर,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखन परीक्षा
उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एसआरव्ही-1099/प्र.क्र.7/99/बारा,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 11 जून, 1999.

वाचा :- 1. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-टंलेप्र-1081/सीआर-344/20ब, दिनांक 6 मे, 1991.

2. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-1093/सीआर-10/93/बारा, दिनांक 3 सप्टेंबर, 1993.

3. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरटीआर-1094/प्र.क्र.8/94/बारा, दिनांक 24 जून, 1997.

* * * * *

## शासन निर्णय

लिपिक-टंकलेखक, लघुटंकलेखक, लघुलेखक तसेच स्वीय सहाय्यक या संवर्गासाठी सेवाप्रवेश नियम संदर्भाधीन शासन अधिसूचना दिनांक 3 सप्टेंबर, 1993 व 24 जून, 1997 अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

2. या नियमांच्या अंमलबजावणी संदर्भात काही नियुक्ती अधिकाऱ्यांनी अशी शंका उपस्थित केली की, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-टंलेप्र-1081/सीआर-344/20-ब, दिनांक 6 मे, 1991 अन्वये विहित करण्यात आलेल्या मराठी टंकलेखन/लघुलेखन अत्यावश्यक अर्हतासंबंधीच्या तरतुदी, सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार लागू होतात किंवा नाही ?

3. या संदर्भात आता असे स्पष्ट करण्यात येते की, वरील अनुक्रमांक 2 व 3 येथे संदर्भित केलेल्या सेवा प्रवेश नियमाच्या अंमलबजावणीप्रयोजनार्थ लिपिक-टंकलेखक, लघुटंकलेखक, लघुलेखक व स्वीय सहाय्यक या पदांवर इंग्रजी टंकलेखन/लघुलेखन अर्हताप्राप्तधारक कर्मचाऱ्यांना 6 मे, 1991 च्या अधिसूचनेमधील तरतुदीनुसार मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य.मा.जोशी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५

भाग

१४

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २००५

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. २०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा.— भारताचे संविधानातील अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे शासकीय विभागातील गट-अ, ब, क आणि ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " प्रतिज्ञापन " याचा अर्थ, शासकीय सेवेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रतिज्ञापन, असा आहे ;

(ख) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ग) " सेवा " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील नागरी सेवा किंवा इतर कोणतीही सेवा, असा आहे ;

(घ) " लहान कुटुंब " याचा अर्थ, दोन मुले यांसह पत्नी व पती असा आहे ;

**स्पष्टीकरण.**----या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल,

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक मुलाचा किंवा मुलांचा समावेश होत नाही,

(तीन) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु, व्याख्या न केलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. **लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाची आवश्यकता.**—शासकीय सेवेतील गट अ, ब, क किंवा ड मधील पद भरतीचे विनियमन करण्याच्या बाबतीत करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश किंवा विलेख किंवा त्याबाबत करण्यात आलेले इतर कोणतेही आदेश किंवा विलेख यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ही, कोणत्याही शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब, गट-क किंवा गट-ड मधील पदाच्या नियुक्तीसाठी एक अतिरिक्त अत्यावश्यक अट असेल :

परंतु, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकास दोनापेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तीस, अशा अंमलबजावणीच्या दिनांकास असलेल्या तिच्या मुलांच्या संख्येत जोपर्यंत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडाखाली, नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसूतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

४. **प्रतिज्ञापन सादर करणे.**—शासकीय सेवेतील गट अ, ब, क किंवा ड मधील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, अर्जासोबत या नियमांतील नमुना " अ " मधील प्रतिज्ञापन सादर करील.

५. **नियम लागू नसणे.**—जेथे निवड प्रक्रिया हे नियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी सुरू झाली असेल त्याबाबतीत हे नियम लागू करण्यात येणार नाहीत.

६. **या नियमांच्या तरतुदी शिथिल करण्याचा अधिकार.**—या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, शासनास, न्याय्य आणि संयुक्तिक वाटेल अशा परिस्थितीत आणि अशा रितीने शिथिलतेची कारणे लेखी नोंदवून या नियमातील कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.

## प्रतिज्ञापन

नमुना-" अ "

(नियम ४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कुमारी ........................................................................................................ ,

श्री. ................................................................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय ................ वर्षे, राहणार ..........................................................................................
यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी .......................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ...................... (संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक ............................................................ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......................... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ..................................... नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. कृ. लोखंडे,

शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th March 2005

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV. 2000/CR (17/2000)/XII.—In exercise of the powers conferred by the proviso to the article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules prescribing declaration of the small family as one of the essential qualification for recruitment to Group A, B, C and D posts in Government Department, namely :—

1. *Short title*.—These rules, may be called the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005.

2. *Definitions*.—In these rules, unless the context otherwise requires ,—

(*a*) " Declaration " means a declaration to be given by the candidate applying for Government service ;

(*b*) " Government " means the Government of Maharashtra;

(*c*) " Service " means Civil Service or any other service under Government of Maharashtra ;

(*d*) " Small family " means wife and husband including two children.

*Explanation*.—For the purposes of this clause,—

(*i*) Where a couple has only one child on or after the date of such commencement, any number of children born out of a single subsequent delivery shall be deemed to be one entity ;

(*ii*) " Child " dose not include an adopted child or children.

(*iii*) Words and expressions used in these rules but not defined shall have the same meaning respectively assigned to them in the Maharashtra Civil Service Rules.

3. *Necessity of declaration of Small Family*.—Notwithstanding any things contained in any rules or orders or instruments made in that behalf, regulating recruitment to Group A, B, C or D post in Government Service or any other order or instruments made in that behalf, the declaration of Small Family shall be an additional essential requirement for an appointment to Group A, Group B, Group C or Group D post in any Government service :

Provided that, a person having more than two children on the date of commencement of these rules shall not be disqualified for appointment

under these clause so long as the number of children he had on the date of such commencement dose not increase :

Provided further that a child or more than one child born in a single delivery within the period of one year from the date of such a commencement shall not be taken into consideration for the purpose of disqualification mentioned in this clause.

4. *Submission of declaration*.—A person who desires to apply for any post in Group A, B, C or D in any Government Service shall submit, alongwith the application form, a declaration in FORM ' A ' appended to these rules.

5. *Rules not to apply*.—These rules shall not be made applicable where the selection process was started before the date of commencement of these rules.

6. *Power to Relax the Provisions of these Rules*.—Notwithstanding anything contained in these rules, Government may relax the provisions of any of these rules, under such circumstances in such manner as shall appear it to be just and reasonable and shall record the reasons for any such relaxation.

# DECLARATION

## FORM-A

(*See* Rule 4)

I, Shri/Smt./Kum. ...................................................................................... son/daughter/wife of Shri ......................................................................, aged ...................... years, resident of ......................................................................... ...............................................................................................................................

do hereby declare as follows :—

1. That I have filled my application for the post of ............................

2. I have .................................. (Number) living children as on today. Out of which No. of children born after................... is ........... (mention dates of birth, if any).

3. I am aware that, if any total number of living children are more than two due to the children born after......................................................, I am liable to be disqualified for the same post.

Place :

Date : (Signature)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. K. LOKHANDE,
Deputy Secretary to Government.

# परिविक्षा कालावधी

भाग १५

Probationary period,
Computation of –

GOVERNMENT OF BOMBAY.

POLITICAL AND SERVICES DEPARTMENT,
Circular Memorandum No. 5346/46,
Bombay Castle, 26th August 1952.

CIRCULAR MEMORANDUM.

If persons who are appointed to a post or service on probation take leave, the question arises whether such leave should be excluded while computing the period of probation. No general orders have so far been issued on the point but the general practice followed was that leave was excluded while computing the probationary period which was increased to that extent. Government is now pleased to direct that this practice should be uniformly followed in respect of all services and posts and whenever a person appointed on probation takes leave, his probationary period should be increased to the extent of the leave taken by him. No formal order extending the probationary period in individual cases is necessary but this principle should be followed in computing the probationary period.

By order of the Governor of Bombay,

M.D. BHANSALI,
Chief Secretary to the Government of Bombay,
Political and Services Department.

Administrative Reorganisation
Committee's Recommendation

Extension in probationary period

GOVERNMENT OF MAHARASHTRA,
General Administration Department,
Resolution No. SRV-1369-D,
Sachivalaya, Bombay-32(BR),
Dated the 15th March 1969.

## RESOLUTION.

In paragraph 4.28 of its report the Administrative Reorganisation Committee has stressed the necessity of weeding out an unsuitable officer when he is on probation if the administration is not to be burdened with misfits and with material of doubtful value.

2. Government has accepted the recommendation and is pleased to direct that the probationary period should not be extended from time to time. Further with a view to laying down an uniform limit in respect of extension of probationary period, it is directed that the probationary period should not be extended by a period of more then one years and after this limit is reached, either the probationary period should be terminated or the services of the probationer should be dispensed with.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M.K. GUPTE,
Under Secretary to the Government of Maharashtra
General Administration Department.

परिवीक्षाधीन अधिकारी
सेवेतून कमी करण्यासंबंधीच्या सूचना.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रकक्रमांक : पीएससी-१०८०/१११८/सीएन-८२/८०/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ मार्च, १९८२.

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१३६९/डी, दिनांक १५ मार्च, १९६९.

परिपत्रक :

प्रशासकीय पुनर्रचना समितीच्या शिफारशीला अनुसरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१३६९/डी, दिनांक १५ मार्च, १९६९ मधील परिच्छेद २ अन्वये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत की, परिवीक्षावधिची मुदत एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता वाढवू नये आणि ही वाढीव मुदत संपल्यानंतर एकतर परिवीक्षावधि समाप्त करावा अथवा परिवीक्षाधीन अधिकाऱ्याला सेवेतून कमी करावे.

२. शासन पुढे असाही आदेश देत आहे की, परिवीक्षा कालावधीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याच्या नेमणुकीच्या आदेशात असा स्पष्ट उल्लेख करावा की, जर परिवीक्षाधीन अधिकाऱ्याने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास आणि/किंवा विहित विभागीय परीक्षा, जर काही असल्यास, परिवीक्षावधिमध्ये उत्तीर्ण न केल्यास आणि असा-हेने, त्याचे काम किंवा वर्तणूक अयोग्य अथवा असमाधानकारक आढळल्यास, तो सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, परिवीक्षाधीन अधिकाऱ्याच्या नेमणुकीच्या आदेशात वर नमूद केलेल्या तरतुदींचा न चुकता समावेश करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[ व. अं. कोटेश्वर ],
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**परिविक्षाधीन अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा**
**समाप्त करतांना अनुसरावयाची कार्यपध्दत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक :-एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.२/९९/आठ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २१ मार्च, २०००

वाचा:- १) परिपत्रक शासन, राजकीय व सेवा विभाग, क्रमांक ५३४६/४६,
दिनांक २६.८.१९५२
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६५/डी,
दिनांक १०/५/१९६५
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१३६९/डी,
दिनांक १५/३/१९६९
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०९४/
प्र.क्र.५/९४/आठ, दिनांक ३.२.१९९४

**शासन परिपत्रक**

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३११ (२) मधील तरतूद लक्षात घेता तात्पुरत्या स्वरुपाचे कर्मचारी वगळून जे इतर कर्मचारी आहेत, त्यांना जर गैरवर्तणुकीसाठी सेवेतून बडतर्फ करावयाचे असेल, पदावरुन काढून टाकावयाचे असेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त करावयाचे असेल तर त्यांना त्यांच्यावरील दोषारोपांची माहिती करुन देणे आवश्यक आहे. तसेच त्या दोषारोपांबाबत त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देणे आवश्यक आहे. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही.

२. यास्तव शासन असे आदेश देत आहे की, शासन सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी/कर्मचारी हा सुध्दा शासकीय कर्मचारी म्हणून गणला जावा आणि त्याच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची गैरवर्तणुकीची तक्रार असल्यास, तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन, त्या अनुषंगाने कारवाई करण्यापूर्वी योग्य ती चौकशी करण्यात यावी.

३. प्रारंभिक चौकशीअंती असे कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ५ च्या तरतुदीनुसार सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे अशा जबर शिक्षेस पात्र ठरण्याची शक्यता असल्याचे आढळून आल्यास, त्याच्या विरुध्द सदर नियमातील नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु करावी. विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण होईपर्यन्त अशा कर्मचाऱ्याच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नयेत. परिविक्षा कालावधी मर्यादित स्वरुपाचा असल्याने चौकशी पूर्ण होण्यास अधिक कालावधी लागत असेल तर अशा परिस्थितीत संबंधित परिविक्षाधीन अधिकारी/कर्मचारी यांचा परिविक्षा कालावधी शासनाच्या मान्यतेने चौकशी पूर्ण होईपर्यन्तच्या कालावधीपर्यन्त वाढविण्यात यावा. चौकशीचा निष्कर्ष प्राप्त झाल्यावर त्या निष्कर्षानुसार तातडीने कार्यवाही करावी.

४. तथापि, परिविक्षाधीन अधिकारी/कर्मचारी त्याच्या अपेक्षित दर्जा प्राप्त करीत नसल्यास आणि/किंवा विहित विभागीय परीक्षा, भाषा परीक्षा परिविक्षा कालावधीमध्ये उत्तीर्ण न झाल्यास, त्याची सेवा समाप्त करावयाची असल्यास, परिवीक्षा कालावधी (नियमानुसार अनुज्ञेय वाढीव कालावधीसह) संपल्यानंतर समाप्त करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.कृ.लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

# सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचित केलेले विविध पदाचे सेवा प्रवेश नियम

## भाग १६

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Bombay -400 032 dated the 14th November 1980

CONSTITUTION OF INDIA.

No.RTR-1076/3107-XII- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Consitition of India in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Drivers of motor cars and jeeps in Government offices, namely :-

1. These rules may be called the Drivers of Motor Cars and Jeeps in Government offices (Recruitment) Rules, 1980.

2. Appointment to the post of drivers of motor cars and Jeeps in Government offices shall be made either :-

(a) by promotion from amongst the members of staff in Class IV Government Service, who possess qualifications and experinece mentioned in sub-clauses (ii),(iii),(iv),(v) and (vi) of clause (c); or

(b) by transfer of a member of staff in Class III Government service, who possess qualifications and experinence mentioned in sub-clauses (ii),(iii),(iv),(v) and (vi) of clause (c); or

(c) by nomination from amongst candidates who,

(i) unless already in the service of the Govrtnment of Maharashtra, are not more than thirty-five years of age;

(ii) possess an effective driving lience to drive a heavy vehicle or a motor car of a jeep under the Motor Vehicles Act, 1939:

(iii) have passed at least IVth standard examination of any recognised school and can speak in Marathi and Hindi languages:

(iv) possess not less than three years' experience of driving motor vehicles other than a motor cycle;

(v) have clean record and working knowledge of repairs of a motor car or, as the case may be, of a jeep; and

(vi) possess a good physique and knowledge of topography of the concerned area;

Provided that if candidates withih prescribed period of experience are not available, the period of experience may be relaxed by one year by Government on the recommendation of the selecting authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sd/-
(S.D.UNDE)
Under Secretary to Government.

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 10th April, 1985.

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1080/50/XII – In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the post of Telephone Operator, Class-III, in the offices of the Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called the Telephone Operator in the offices of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 1985.

2. In these rules, unless the context otherwise requires,-

(a) "Government" means the Government of Maharashtra;

(b) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Maharashtra XLI of 1965), and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Telephone Oerator shall be made by nomination from amongst candidates who,-

(i) Unless already in the service of Government, are not more than 28 years of age;

(ii) have passed the Secondary School Certificate Examination; and

(iii) have knowledge of Marathi, English and Hindi, with a fluency in speaking;

Provided that, preference may be given to a candidate possessing training and experience in Telephone Operating ;

Provided further that preference may be given to a candidate who, in the opinion of the Selecting Authority, possesses pleasing manners and agreeable voice ;

-

Provided also that the age limit may be relaxed by Government on the recommendation of the Selecting Authority in favour of candidates having exceptional qualifications or experience or both.

4. A person appointed to the post shall be required to pass the examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing, these examinations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. J. DESHMANE,
Under Secretary to Government.

---

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ मे १९८९.

**भारताचे संविधान**

क्रमांक सीसीएस. २८८६/२२/८६/चौदा-अ.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांमधील कक्ष अधिकारी, सर्वसाधारण राज्य सेवा, वर्ग दोन यांच्या पदांवर करावयाच्या भरतीचे नियंत्रण करण्यासंबंधात पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. (१) या नियमांना मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकाऱ्यांसाठी (सेवाप्रवेश) नियम, १९८९ असे म्हणावे.

(२) ते १ जानेवारी, १९८६ पासून अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास,—

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(क) "अर्हताप्राप्त सहाय्यक" म्हणजे सहाय्यकाने कक्ष अधिकाऱ्याच्या पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शासनाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण झालेला किंवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेला सहाय्यक ;

(ड) "मंत्रालयीन विभाग" म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र शासन कार्य नियमावलीच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला विभाग.

३. मंत्रालयीन विभागांमधील कक्ष अधिकाऱ्यांच्या पदावरील नियुक्ती एक तर—

(अ) मंत्रालयीन विभागांमधील अर्हताप्राप्त सहाय्यकांमधून पात्रतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल ; किंवा

(ब) शासनाकडून वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेला शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक आरसीटी. ११८९/८५४३९/एम-१०, दिनांक १३ ऑक्टोबर, १९८१ या अन्वये राज्य नागरी सेवांमधील तहसिलदार व उप जिल्हाधिकारी यांच्या पदांसाठी असलेल्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी विहित केलेल्या नियमांनुसार आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या संयुक्त स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालांच्या आधारे, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल. या परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी—

(एक) उमेदवाराचे वय १९ वर्षांपेक्षा कमी व २८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते ३३ वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(दोन) उमेदवाराने सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाकडून त्या बाबतीत केलेल्या आदेशाद्वारे योग्य रीतसर मान्यता देण्यात आलेली इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केलेली असली पाहिजे.

४. पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ६६$\frac{2}{3}$ : ३३$\frac{1}{3}$ असे असेल.

५. कक्ष अधिकाऱ्याच्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन राहील व या कालावधीत शासनाकडून त्या बाबतीत विहित करण्यात येईल असे प्रशिक्षण घेईल व विहित केलेल्या विभागीय परीक्षांमध्ये उत्तीर्ण होईल :

परंतु, शासनास, अशा परीक्षांमध्ये जी व्यक्ती उत्तीर्ण झालेली नसेल किंवा तिने शासनाच्या दृष्टीने परिवीक्षा कालावधी समाधानकारक रीत्या पूर्ण केलेला नसेल त्या व्यक्तीचा परिवीक्षा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी वाढविता येईल :

परंतु, आणखी असे की, परिवीक्षाधीन असलेला जो कक्ष अधिकारी विहित विभागीय परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणार नाही, किंवा परिवीक्षाधीन कालावधीत तो परिवीक्षाधीन कालावधी समाधानकारक रीत्या पूर्ण करणार नाही तो कक्ष अधिकारी शासकीय सेवेमधून मुक्त केला जाण्यास पात्र ठरेल.

६. कक्ष अधिकाऱ्याच्या पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला मग ती नियुक्ती पदोन्नतीद्वारे असो किंवा नामनिर्देशनाद्वारे असो—त्या बाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी परीक्षांमध्ये, ती त्या परीक्षा यापूर्वीच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा त्या परीक्षांमधून उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, उत्तीर्ण व्हावे लागेल.

७. कक्ष अधिकाऱ्यांच्या पदावर नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती मंत्रालयाच्या कोणत्याही विभागात नियुक्ती केली जाण्यास किंवा बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ए. डी. [illegible],
शासनाचे उप सचिव.

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मार्च २००८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीसीए. १७०६/सी.आर. ४५/०६/१४ब.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुका अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, १९८९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

(१) या नियमांना, मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००८, असे म्हणावे.

(२) मंत्रालयीन विभागातील, कक्ष अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, १९८९ (यात यापुढे ज्यांचा उल्लेख " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम ४ मधील " प्रमाण ६६ २/३:३३ १/३ " या मजकुराऐवजी, " प्रमाण ८०:२० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(३) मुख्य नियमांच्या नियम ६ नंतर, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" ६क. ह्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ग. दळवी,**
शासनाचे उप सचिव.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी, १९९०.

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसबीएस. १५८६/७८/चौदा-ब.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सध्या अस्तित्वात असलेले या संबंधीचे सर्व नियम, आदेश व अनुदेश निष्प्रभावित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागातील निवडश्रेणी लघुलेखक, वर्ग दोन या पदावरील नियुक्तीचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

(१) **संक्षिप्त नाव.**—या नियमांना "निवडश्रेणी लघुलेखक (सेवाप्रवेश) नियम, १९९०" असे संबोधण्यात येईल.

(२) **पदोन्नतीने नियुक्ती.**—निवडश्रेणी लघुलेखकाच्या पदावरील नियुक्ती नियमित तत्त्वावर उच्चश्रेणी लघुलेखक हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या तत्त्वावर आणि उच्चश्रेणी लघुलेखकाच्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी अखंड सेवा झालेल्या, योग्य व्यक्तींची पदोन्नती करून करण्यात येईल.

(३) **हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण.**—ह्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीला, याबाबत विहित केलेल्या नियमांनुसार हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा जर ती ह्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाली नसेल तर किंवा तिला अशा परीक्षेत सूट मिळाली नसेल तर, उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(४) **सामाईक संवर्ग.**—निवडश्रेणी लघुलेखकाचा संवर्ग हा, सर्व मंत्रालयीन विभागांकरिता सामाईक संवर्ग असेल आणि या पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्ती मंत्रालयीन विभागांच्या कक्षेत बदली होण्यास पात्र राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. द. करंदीकर,
शासनाचे उप सचिव

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ डिसेंबर १९९०

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही.११९०/३४७/चौदा-ब.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायक, सर्वसाधारण राज्य सेवा, वर्ग एक या पदाच्या सेवाप्रवेशांचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत ; ते असे :—

१. या नियमांना, मंत्रालयीन विभागांमधील वरिष्ठ स्वीय सहायक, सर्वसाधारण राज्य सेवा, वर्ग एक (सेवाप्रवेश) नियम, १९९० असे म्हणावे.

२. वरिष्ठ स्वीय सहायक या पदावरील नियुक्ती ही, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या सलग कालावधीसाठी निवडश्रेणी लघुलेखक हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून त्यांच्या योग्यतेच्या अधीनतेने ज्येष्ठतेच्या आधारे पात्र व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल.

३. या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांनुसार, जर ती यापूर्वीच हिंदी आणि मराठी परीक्षेत उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसेल तर या परीक्षांमध्ये तिला उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

४. या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती मंत्रालयातील कोणत्याही विभागात बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एम. डी. करंदीकर,
शासनाचे उप सचिव.

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९१

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १३९१/चौदा.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत अंमलात असलेले नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांमधील शासनाचे अवर सचिव या पदांच्या सेवाप्रवेश नियमांचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. (१) या नियमांना, "मंत्रालयीन विभागांमधील शासनाचे अवर सचिव (सेवा प्रवेश) नियम, १९९१" असे म्हणावे.

(२) ते दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी व तेव्हापासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "सहाय्यक सचिव" याचा अर्थ, मंत्रालयीन विभागांमधील सहाय्यक सचिव, असा आहे ;

(ख) "सेवा वर्ग-एक" याचा अर्थ, शासनाचा राज्य सेवा, वर्ग-एक, असा आहे ;

(ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(घ) "मंत्रालयीन विभाग" याचा अर्थ, विधी व न्याय विभागाची विधी शाखा वगळता, शासनाचा कोणताही मंत्रालयीन विभाग, असा आहे ;

(ङ) "कक्ष अधिकारी" याचा अर्थ, एखाद्या मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी, असा आहे ;

३. एखाद्या मंत्रालयीन विभागामधील शासनाचा अवर सचिव या पदावरील नियुक्ती ही एकतर ----

(क) सहायक सचिव किंवा कक्ष अधिकारी या पदावर नियमित नियुक्ती करण्यात आल्यानंतर सलग तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी हे पद धारण करीत असलेल्या व्यक्तींमधून निवडसूचीच्या आधारे योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल.

**स्पष्टीकरण** .— ज्या कालावधीत, एखादी व्यक्ती सहायक सचिव किंवा कक्ष अधिकाऱ्याचे पद धारण करीत आहे अशा कालावधीची परिगणना करताना, त्यात ज्या कोणत्याही कालावधीमध्ये एखाद्या व्यक्तीने दिनांक १ जानेवारी १९८६ पूर्वी अधीक्षक हे पद धारण केले आहे त्या कालावधीचा समावेश करण्यात येईल ; किंवा

(ख) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीद्वारे, किंवा

(ग) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही सेवेतील वर्ग-एक मधील योग्य अधिकाऱ्याच्या बदलीद्वारे,

करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एच. ए. डी. सॅव्हीयन,**

शासनाचे प्रधान सचिव (सेवा).

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ सप्टेंबर १९९२

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १३९०/प्र.क्र. ४/९०/चौदा.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत अंमलात असलेले नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांमधील शासनाचे उप सचिव या पदांच्या सेवाप्रवेश नियमांचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. (१) या नियमांना, " मंत्रालयीन विभागांमधील शासनाचे उप सचिव (सेवा प्रवेश) नियम, १९९२ " असे म्हणावे.

(२) ते दिनांक २५ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " सेवा वर्ग-एक " याचा अर्थ, शासनाचा राज्य सेवा, वर्ग-एक, असा आहे ;

(ख) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) " मंत्रालयीन विभाग " याचा अर्थ, विधी व न्याय विभागाची विधी शाखा वगळता, शासनाचा कोणताही मंत्रालयीन विभाग, असा आहे ;

(घ) " अवर सचिव " याचा अर्थ, एखाद्या मंत्रालयीन विभागातील अवर सचिव, असा आहे ;

३. एखाद्या मंत्रालयीन विभागामधील शासनाचा उप सचिव या पदावरील नियुक्ती ही, एकतर —

(क) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीद्वारे ;

किंवा

(ख) अवर सचिव या पदावर नियमित नियुक्ती करण्यात आल्यानंतर जी व्यक्ती सलग तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी हे पद धारण करीत असलेले किंवा ते धारण करीत असल्याचे मानण्यात येत असेल अशा व्यक्तींमधून निवडसूचीच्या आधारे योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन ;

किंवा

(ग) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही सेवेतील वर्ग-एक मधील या पदाला समकक्ष असणारे पद धारण करीत असलेल्या योग्य अधिकाऱ्याच्या बदलीद्वारे, करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. वासुदेवन,

शासनाचे सचिव (सेवा).

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**
Mantralaya, Bombay 400 032, Dated the 3rd September, 1993.
**CONSTITUTION OF INDIA.**

No. SRV-1093/C.R.10/93/XII, In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of the Government Notification, General Administration Department, No. RTR-1082/1/cr-7/85/XII, dated the 18th December, 1986, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulation recruitment to the posts of Clerk-typist in Government offices, outside Greater Bombay, namely:-

1. These rules may be called the Clerk-typist in Government offices, outside Greater Bombay (Recruitment) Rules, 1993.

2. In these rules unless the context requires otherwise,-

(a) "Class IV Service" means Class IV service as defined under the Maharashtra Civil Services (General Conditions of Service) Rules, 1981;

(b) "Government" means the Government of Maharashtra;

(c) " Government Commercial Certificate" means a certificate in typewriting awarded by the Bureau of Government Examination, Directorate of Education, Government of Maharashtra and include a certificate issued by any other institution as may be specifically declared by Government to be equivalent thereto .

(d) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a divisional Board under the Maharashtra Secondary Education Boards Act, 1965(Mah.XLI of 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Clerk-typist shall be made either,-

(a) By promotion, on the basis of seniority subject to fitness amongst the person holding the post of class IV service, having not less than three years, regular service and possess the educational qualifications prescribed for appointment by nomination in sub. clauses (ii) (iii) of clause (b), or

(b) By nomination from amongst candidates, who -

(i) are not less than eighteen years and not more than thirty years of age;

(ii) have passes the Secondary School Certificate Examination; and

(iii) possess the Government Commercial Certificate for speed of not less than 30 words per minute in Marathi Typewriting or 40 words per minute in English typewriting as the case may be; or

(c) By a appointment of a person possessing qualifications mentioned in sub-clauses (ii) and (iii) of clauses (b) on compassionate ground, in accordance with the orders issues in this behalf by Government from time to time :

Provided that, the number of vacancies for the cadre to be filled by promotion of member of class IV service shall not exceed 25 percent of the total vacancies occurring in a particular year :

Provided further that, if a person to be appointed on compassionate ground and also from the category of ex-servicemen does not possess the certificate refereed to in sub-clause (iii) of clause (b), than such person may be appointed, but he shall obtain such certificate within eleven months from the date of joining the post :

Provided also that, the upper age limit prescribed under sub-clause (i) or clause (b) shall not apply to a person appointed on compassionate ground and ex-servicemen.

4. a person appointed as Clerk-typist under these rules or to any of the posts of Clerk, Clerk-typist in any office where the combined cadre of these posts exist, whether before or after the date of commencement of these rules, shall be required to pass the following examination, namely :-

(a) departmental examination, wherever prescribed, or required under any rules for the time being in force, in accordance with the rules made in that behalf, and

(b) examination in Hindi and Marathi, in accordance with the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**SHANTA SHASTRY**
***Secretary to Government***

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जून १९९५.

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर.१०८६/चौदा-(अ).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागातील सहायक या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत, ते असे —

१. (१) या नियमांना मंत्रालयीन विभागातील "सहायक" (सेवाप्रवेश) नियम, १९९५ असे म्हणावे.

(२) ते दिनांक २८ ऑक्टोबर १९९२ रोजी व तेव्हापासून अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

२. या नियमांमध्ये अन्यथा संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "सहायक" याचा अर्थ, मंत्रालयाच्या कोणत्याही विभागातील सहायक, असा आहे.

(ब) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(क) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातील कोणताही विभाग, असा आहे;

(ड) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(इ) "कनिष्ठ स्तरीय कर्मचारी" याचा अर्थ, लिपिक, लिपिक-टंकलेखक किंवा टंकलेखक या पदांना लागू असलेल्या मात्र शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पीसीपी.१२७८/सीआर १६५/एसइआर-१०, दिनांक १ जुलै १९७८ अन्वये विहित करण्यात आलेल्या वरच्या वेतनश्रेणीवर आले असेल किंवा नियुक्त करण्यात आले असेल अशा मुख्य टंकलेखकांसह टंकलेखकांना लागू नसलेल्या संबद्ध सेवाप्रवेश नियमानुसार विभागामध्ये नियुक्त केलेला लिपिक, लिपिक-टंकलेखक किंवा टंकलेखक असा आहे.

३. विभागातील सहायक या पदावरील नियुक्ती ही एक तर,—

(अ) कनिष्ठ स्तरीय कर्मचारी असलेल्या व कनिष्ठ स्तरावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा करणाऱ्या आणि त्यांच्यासाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण असलेल्या किंवा त्यातून सूट मिळालेल्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल; किंवा

(ब) आयोगाशी वेळोवेळी याबाबतीत विचारविनिमय करून शासनाने काढलेल्या आदेशांनुसार, आयोगाने घेतलेल्या मर्यादित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाने तयार केलेल्या सामायिक गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करून करण्यात येईल. ही परीक्षा सर्व विभागातील कनिष्ठ स्तरीय कर्मचाऱ्यांसाठी सामायिक असेल ; किंवा

(क) आयोगाने घेतलेल्या ज्या स्पर्धा परीक्षेस बसण्यासाठी,—

(एक) या पदासाठी अर्ज मागविण्यात येणारी जाहिरात आयोगाच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्राच्या शासकीय राजपत्रात किंवा कोणत्याही वर्तमानपत्रात यापैकी ज्यात अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल ते, प्रसिद्ध करण्यात येण्याच्या पहिल्या प्रसिद्धिच्या दिनांकापासून लगतनंतरच्या तीन महिन्यानंतर येणाऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी, ज्या उमेदवाराने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली असतील मात्र त्याने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली नसतील, आणि

(दोन) ज्या उमेदवाराने सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा त्याच्याशी समतुल्य असल्याचे शासनाने जाहीर केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असेल अशा उमेदवारांच्या परीक्षेतील निकालाच्या आधारे नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

४. कॅलेंडर वर्षात, या पदावर करावयाची नियुक्ती ही पदोन्नतीद्वारे, मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे निवड करून व नामनिर्देशनाद्वारे ३० : ३० : ४० या प्रमाणात करण्यात येईल.

५. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, शासनाच्या मते, अशा सेवेची निकड भासल्यास, शासनास आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर सहायकाच्या पदावर पदोन्नतीद्वारे, मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे निवड करून व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी विहित केलेले गुणोत्तर शिथिल करून नियुक्ती करण्यात येईल.

६. त्या पदावर, मग पदोन्नतीद्वारे, मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे निवड करून किंवा नामनिर्देशनाद्वारे असो, नियुक्त केलेल्या व्यक्तीस, त्याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा, जर तिने त्या परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण कराव्या लागतील.

७. त्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती कोणत्याही वेळी कोणत्याही विभागात बदली करण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एम. एन. जोशी,
शासनाचे उप सचिव.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑक्टोबर, १९९५.

**भारताचे संविधान.**

क्रमांक : आरटीआर १०९४/प्र.क्र.९/९४/१२- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमिक करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विभागातील, सोबत जोडलेल्या अनुसूचितील गट "ड" पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :-

१. या नियमांना महाराष्ट्र शासनाच्या विभागातील गट "ड" पदांचे (सेवाप्रवेश) नियम, १९९५ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, --

(अ) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या पदांवर सेवाभरती करण्याबाबत "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे त्या पदावर नेमणुका करण्यात जो सक्षम आहे असा प्राधिकारी ;

(ब) विभाग म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले विभाग, यामध्ये अशा नियमांच्या अधिपत्याखालील इतर कार्यालये देखील अंतर्भूत आहेत ;

(क) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ड) "अनुसूची" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची.

३. अनुसूचीमधील भाग "अ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका अनुसूचीमधील भाग "ब" मध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करीत आहेत अशा व्यक्तींमधून आणि अनुसूची भाग "क" मधील पदांवर काम करीत आहेत , आणि ज्यांची किमान ३ वर्षांची नियमित सेवा त्या पदांवर झालेली आहे आणि नियम-६ च्या खंड "क" च्या उपखंड (२) मधील नामनिर्देशनाने भरतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत अशा व्यक्तींमधून "ज्येष्ठता अधीन पात्रता" या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करता येतील.

४. अनुसूचीमधील भाग "अ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :-

(अ) अनुसूची मधील भाग "ड" मध्ये उल्लेख केलेल्या पदावर काम करीत असलेल्या आणि ज्यांची त्या पदांवर किमान ३ वर्षांची नियमित सेवा झाली आहे त्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने किंवा,

(ब) अनुसूचीमधील भाग "क" मधील पदांवर काम करीत असलेल्या आणि नियम "६" च्या खंड "क" च्या उपखंड (२) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने.

५. अनुसूचीमधील भाग "क" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका अनुसूचीमधील भाग "ई" मध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करीत असलेल्या व्यक्तींकडून, ज्यांची किमान ३ वर्षांची नियमित सेवा त्या पदांवर झालेली आहे, अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करता येतील.

६. अनुसूचीमधील भाग "ड" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही पध्दतीने करता येतील :-

(अ) अनुसूची भाग "फ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवर काम करीत असलेल्या व्यक्तींमधून ज्यांची त्या पदांवर किमान ३ वर्षांची नियमित सेवा झालेली आहे, अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने किंवा,

(ब) अनुसूचीमधील भाग "ई" मधील काम करीत असलेल्या आणि नियम-६ च्या खंड (क) च्या उपखंड (२) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने किंवा,

(क) पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने :-

(१) ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३० वर्षांपेक्षा जास्त नाही आणि

(२) जो शासनाने मान्यता दिलेल्या शाळेमधून प्राथमिक शाळेची ४ थी इयत्ता उत्तीर्ण आहे.

परंतु, नियुक्ती प्राधिका-यांस जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्ती वेतनधारक असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल.

७. अनुसूची "ई" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३० वर्षांपेक्षा जास्त नाही, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येतील. परंतु, नियुक्ती प्राधिका-यास जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्ती वेतनधारक आहेत अशा उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल.

८. अनुसूचीमधील भाग "फ" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका :-

(१) ज्यांचे वय १५ वर्षांपेक्षा कमी नाही आणि १८ वर्षांपेक्षा जास्त नाही आणि

(२) जो शासनाने मान्यता दिलेल्या शाळेमधून प्राथमिक शाळेची ४ थी इयत्ता उत्तीर्ण आहे अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येतील.

९. वरील नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अनुसूचिमध्ये उल्लेख केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदांवर आवश्यकतेनुसार शासनास योग्य वाटतील असे विशेष अथवा सर्वसाधारण आदेश निर्गमित करुन त्यामध्ये निर्देशित केलेल्या पध्दतीनुसार विशेष परिस्थितीत सेवा भरती करता येईल.

## अनुसूची

| अनुक्रमांक | पदनाम |
|---|---|
| | भाग-अ |
| १ | जमादार |
| २ | चोपदार |
| | भाग-ब |
| ३ | हवालदार |
| ४ | नाईक |
| ५ | उद्वाहन चालक |
| ६ | आवेष्टक |
| ७ | फाईल करी |
| ८ | दफ्तरी |
| ९ | दप्तरबंद |
| १० | रोनिओ शिपाई/रोनिओ चालक |
| ११ | मुकादम |
| १२ | दारवान |
| | भाग-क |
| १३ | स्वच्छक मुकादम |
| १४ | सफाईगार मुकादम |
| | भाग-ड |
| १५ | शिपाई |
| १६ | सहायक दारवान |
| १७ | संदेश वाहक |
| | भाग-इ |
| १८ | स्वच्छक |
| १९ | सफाईगार |
| | भाग-फ |
| २० | बाल शिपाई |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य.मा.जोशी
शासनाचे उप सचिव.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून १९९७.

भारताचे संविधान.

क्रमांक आरटीआर. १०९४/प्र. क. ८/९४/१२.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या बृहन्मुंबई बाहेरील कार्यालयातील "स्वीय सहायक गट ब", "उच्चश्रेणी लघुलेखक- गट ब", "निम्नश्रेणी लघुलेखक-गट-ब" व "लघुटंकलेखक गट-क" या पदांच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयातील "स्वीय सहायक-गट-ब" "उच्चश्रेणी लघुलेखक-गट ब", "निम्नश्रेणी लघुलेखक- गट ब" आणि "लघुटंकलेखक-गट- क" पदांचे (सेवाप्रवेश) नियम, १९९७, असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर—

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन असा आहे,

(ब) "शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र" म्हणजे शासकीय परीक्षा मंडळाचे, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले प्रमाणपत्र आणि शासनाने ह्या उद्देशासाठी जिला मान्यता दिलेली आहे, अशी अन्य कोणतीही संस्था, यांनी दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ,

(क) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (महा. एक्स. एल. आय्. १९६५) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र आणि या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.

३. उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तिची "ज्येष्ठता अधिन पात्रता" या निकषावर "स्वीय सहायक" पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

४. उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.—

(अ) निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि नामनिर्देशनाने भरतीसाठी या नियमाच्या खंड (ब) च्या उपखंड (२) नुसार विहित केल्यानुसार लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाने शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तींची, "ज्येष्ठता अधिन पात्रता" या निकषावर पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने—

(१) ज्या व्यक्तीचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि तीस वर्षांपेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(३) जी व्यक्ति लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

५. निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.—

(अ) लघुटंकलेखक या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल. आणि या नियमांच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तिची " जेष्ठता अधिन पात्रता " या निकषावर पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने,

(१) ज्या व्यक्तिचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि तीस वर्षांपेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तींचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(३) जी व्यक्ति लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

५. लघुटंकलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.—

(अ) लिपिक टंकलेखक या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि या नियमांच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित केल्यानुसार लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तिची " जेष्ठता अधिन पात्रता " या निकषावर या पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

परंतु लिपिक-टंकलेखक या संवर्गाच्या पदोन्नती साखळीतील पदोन्नती सोडून देण्याच्या विकल्पाची ज्या टंकलेखकांनी निवड केली आहे, त्या टंकलेखकांना सुद्धा त्यांच्या आपापसातील ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने,

(१) ज्या व्यक्तिचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही, आणि तीस वर्षांपेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(३) जो व्यक्ती लघुलेखनाचा वेग किमान ८० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट, या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

७. नियम ४, ५ आणि ६ येथे नमूद केलेल्या पदांवरील नेमणूका पदोन्नती आणि नामनिर्देशनाने ५० : ५० या प्रमाणात करण्यात येतील.

८. उपरोल्लेखित कोणत्याही पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तिला, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा त्या संबंधी केलेल्या नियमांनुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

९. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेची निकड लक्षात घेऊन, वरील नियम ७ अन्वये नामनिर्देशनाने भरतीसाठी जे प्रमाण विहित केले आहे, ते शिथिल करावे, असे शासनाच्या मते आवश्यक वाटल्यास, सदरहू प्रमाण शिथिल करून शासनास उपरोल्लेखित पदांवर नेमणूक करता येऊ शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
सह सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th June, 1997

CONSTITUTION OF INDIA.

No.RTR-1094/CR. No. 8/94/12.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Personal Assistant-Group 'B' Higher Grade Stenographer-Group 'B' Lower Grade Stenographer-Group 'B' and Steno-Typist Group 'C' in the various offices of the Government outside Greater Mumbai, namely :—

1. These rules may be called the Personal Assistant Group 'B', Higher Grade Stenographer-Group- 'B' Lower Grade Stenographer-Group 'B' and Steno-Typist-Group-' C' in the various offices of Government outside Greater Mumbai (Recruitmnet) Rules, 1997.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Government" means the Government of Maharashtra.

(*b*) "Government Commercial Certificate" means a certificate issued by the Bureau of Government Examinations, Directorate of Technical Education, Government of Maharashtra and includes a certificate issued by any other institution as may be specifically declared by Government to be equivalent thereto ;

(*c*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Personal Assistant shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst persons holding the post of Higher grade Stenographer having not less than three years regular service in that post.

4. Appointment to the post of Higher Grade Stenographer shall be made either—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst persons holding the post of Lower Grade Stenographer having not less than three years regular service in that post and possessing Government Commercial Certificate with the speed in shorthand and typewriting prescribed for appointment by nomination in sub-clause (*iii*) of clause (*b*) of this rule ;

(*b*) by nomination from amongst persons who,—

(*i*) are not less than 18 years and not more than thirty years of age ;

(*ii*) have passed the Secondary School Certificate Examination; and

(*iii*) possess Government Commercial Certificate with the speed of not less than 120 words per minute in shorthand and not less than 40 words per minute in English typewriting or 30 words per minute in Marathi typewriting.

5. Appointment to the post of Lower Grade Stenographer shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst persons holding the post of Steno-typist, having not less than three years regular service in that post, and possessing Government Commercial Certificate with the speed in shorthand and typewriting prescribed for appointment by nomination in sub-clause (*iii*) of clause (*b*) of this rule ; or

(*b*) by nomination from amongst persons who,—

(*i*) are not less than 18 years and not more than thrity years of age ;

(*ii*) have passed Secondary School Certificate Examination ; and

(*iii*) possess Government Commercial Certificate with the speed of not less than 100 words per minute in shorthand and not less than 40 words per minute in English typewriting or 30 words per minute in Marathi typewriting.

6. Appointment to the post of Steno-typist shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst persons holding the post of Clerk-typist having not less than three years regular service in that post and possess Government Commercial Certificate with speed in shorthand and typewriting prescribed for appointment by nomination in sub-clause (*iii*) of clause (*b*) of this rule :

Provided that the typists who opt to forgo the promotion in the channel of Clerk-typist, shall also be considered for promotion according to their *inter-se* seniority ; or

(*b*) by nomination from amongst the persons who,—

(*i*) are not less than 18 years and not more than thirty years of age ;

(*ii*) have passed Secondary School Certificate Examination ; and

(*iii*) possess Government Commercial Certificate with the speed of not less than 80 words per minute in shorthand and not less than 40 words per minute in English typewriting or 30 words per minute in Marthi typewriting.

7. Appointment to the posts mentioned in rules 4, 5 and 6 by promotion and by nomination shall be made in the ratio of 50 : 50.

8. A person appointed to any of the posts shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing, those examinations.

9. Notwithstanding anything contained in these rules, if in the opinion of Government the exigencies of service so require, Government may, make appointments under rules 4, 5 and 6 above, in relaxation of the ratio prescribed for appointment by nomination under rule 7.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Y. M. JOSHI,
Joint Secretary to Government.

उच्चश्रेणी / निम्नश्रेणी / लघुटंकलेखक



सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै १९९७.

**भारताचे संविधान.**

क्रमांक एएससी. १५९३/३६१९/१४-अ.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व नियम, आदेश आणि अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे बृहन्मुंबईतील विविध शासकीय कार्यालयातील इंग्रजी व मराठी उच्च-श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक आणि लघु टंकलेखक या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत, हे नियम असे आहेत :—

१. या नियमांना बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांतील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघु टंकलेखक (सेवा प्रवेश) नियम १९९७ असे संबोधण्यात येईल.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(क) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

(ख) "शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र" याचा अर्थ शासकीय परीक्षा मंडळ, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र असा आहे आणि त्यात शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून विनिर्दिष्टपणे जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही संस्थेकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचा समावेश आहे.

(ग) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम १९६५ (१९६५ चा महा. ४१) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विभागीय मंडळाने आयोजित केलेल्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा असा आहे आणि त्यात शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही परीक्षेचा समावेश आहे.

३. उच्च श्रेणी लघुलेखक या पदावर करावयाची नेमणूक ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करता येईल :—

(क) निम्नश्रेणी लघुलेखक हे पद धारण करणाऱ्या आणि ५, नियमांच्या खंड (ख) उपखंड (२) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेल्या गतीचे लघुलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असणाऱ्या ज्या व्यक्तींची निम्नश्रेणी लघुलेखक पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झाली आहे अशा व्यक्तींपैकी योग्य व्यक्तींची पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

(ख) (१) जे उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहेत.

(२) ज्या उमेदवाराकडे १२० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आहे, आणि

(३) ज्या उमेदवारांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत आणि ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नाही.

"मात्र असे की शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करण्यात येईल."

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून नियुक्ती करता येईल.

४. निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर करावयाची नेमणूक ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करता येईल.

(क) लघुटंकलेखक हे पद धारण करणाऱ्या आणि या नियमांच्या खंड (ख) उपखंड (२) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेल्या गतीचे लघुलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असणाऱ्या ज्या व्यक्तींची लघुटंकलेखक पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झाली आहे अशा व्यक्तींपैकी योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

(ख) (१) जे उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहेत.

(२) ज्या उमेदवारांकडे १०० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आहे; आणि

(३) ज्या उमेदवारांनी. वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत आणि ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नाही.

"मात्र असे की शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करण्यात येईल."

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून नियुक्ती करता येईल.

५. लघुटंकलेखक या पदावर करावयाची नेमणूक ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करता येईल :—

(क) लिपिक-टंकलेखक किंवा टंकलेखक हे पद धारण करणाऱ्या आणि या नियमांचा खंड (ख) उपखंड (२) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेल्या गतीचे लघुलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असणाऱ्या ज्या व्यक्तींची लिपिक-टंकलेखक किंवा टंकलेखक पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झाली आहे अशा व्यक्तींपैकी योग्य व्यक्तीची पदोन्नतीने नेमणूक करता येईल :

परंतु लिपिक-टंकलेखकांच्या सामायिक संवर्गाशी संबद्ध होण्याचा विकल्प दिलेला नाही अशा टंकलेखकांचा किंवा लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नतीच्या संधी सोडून दिलेल्या टंकलेखकांचा आपापसांतील ज्येष्ठता व पात्रता यानुसार पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.

(ख) (१) जे उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहेत.

(२) ज्या उमेदवारांकडे ८० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श. प्र. मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आहे, आणि

(३) ज्या उमेदवारांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत आणि ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नाही.

"मात्र असे की शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करण्यात येईल."

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून नियुक्ती करता येईल.

परंतु सहायक पदावर पदोन्नती मिळण्याचा पर्याय स्वीकारलेल्या किंवा सहायक पदावर पदोन्नती स्वीकारलेल्या लिपिक-टंकलेखकांनी लघुटंकलेखक संवर्गातील पदोन्नतीचा हक्क सोडला असल्याचे मानण्यात येईल.

६. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती ही ५० : ५० या प्रमाणात करण्यात येईल.

७. मंत्रालयीन विभागातील, नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी नियुक्ती करावयाच्या व्यक्ती, एका विभागातून दुसऱ्या विभागात बदली होण्यास पात्र असतील.

८. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने असो किंवा नामनिर्देशनाने असो—नियुक्ती केलेली व्यक्ती हिंदी व मराठी परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल तर, किंवा तिला त्या परीक्षेस उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, त्या व्यक्तीने, या संबंधात करण्यात आलेल्या नियमानुसार या परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

९. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेच्या निकडीच्या दृष्टीने आवश्यक आहे असे शासनाचे मत असेल तर, शासन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी नियुक्तीपूर्वी, विचारविनिमय करून आवश्यक असेल त्याबाबतीत नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर, पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने सेवाप्रवेश देण्यासंबंधीच्या या नियमांमध्ये विहित केलेले टक्केवारीचे प्रमाण शिथिल करून, नियुक्ती करु शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. रं. भिजसुरे,
शासनाचे सह सचिव.

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२१/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, डिसेंबर २५, २००८/पौष ४, शके १९३०

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ नोव्हेंबर २००८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि. १५०७/प्र.क्र. १३४/०७/१४-अ.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक (सेवाप्रवेश) नियम, १९९७ या[illegible] सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००८ असे म्हणावे.

२. बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक (सेवाप्रवेश) नियम, १९९७ (यात यापुढे ज्यांचा निदेश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ३ मधील पोटनियम (ख) मध्ये,—



[ किंमत : रुपये ५.०० ]

(क) खंड (३) मधील " ३० " या आकड्याऐवजी " ३३ " हा आकडा दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (३) च्या परंतुकामधील " शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या " या मजकूराऐवजी, " जे उमेदवार अगोदरच शासन सेवेत आहेत आणि ज्यांची नियुक्ती यथोचितरित्या नियमित झालेली आहे अशा उमेदवारांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य नियमाच्या नियम ४ मधील पोटनियम (ख) मध्ये,—

(क) खंड (३) मधील " ३० " या आकड्याऐवजी " ३३ " हा आकडा दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (३) च्या परंतुकामधील " शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या " या मजकूराऐवजी, " जे उमेदवार अगोदरच शासन सेवेत आहेत आणि ज्यांची नियुक्ती यथोचितरित्या नियमित झालेली आहे अशा उमेदवारांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. मुख्य नियमाच्या नियम ५ मधील पोटनियम (ख) मध्ये,—

(क) खंड (३) मधील " ३० " या आकड्याऐवजी " ३३ " हा आकडा दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (३) च्या परंतुकामधील " शासकीय सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या " या मजकूराऐवजी, " जे उमेदवार अगोदरच शासन सेवेत आहेत आणि ज्यांची नियुक्ती यथोचितरित्या नियमित झालेली आहे अशा उमेदवारांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. मुख्य नियमाच्या नियम ६ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येतील,—

" ६. नियम ३ व ४ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने करावयाची नियुक्तीही, ५०:५० या प्रमाणात तर, नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती ही २०:८० या प्रमाणात करण्यात येईल. "

६. मुख्य नियमाच्या नियम ८ नंतर पुढील नियम दाखल करण्यात येतील,—

" ८क. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर मग पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने असो, नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक आणि इंग्रजी टंकलेखक यांच्यासाठी सक्तीची मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखन परीक्षा) नियम, १९९१ यामध्ये तरतूद केलेली परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल ;

८ख. नियम ३, ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर मग पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने असो, नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. ग. दळवी,
शासनाचे उप सचिव.

३८७ महाराष्ट्र शासन राजपत्र, नोव्हेंबर २०, २००३/कार्तिक २९, शके १९२५ [भाग चार-अ

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ नोव्हेंबर २००३

अधिसूचना

124

भारताचे संविधान

क्रमांक आरटीआर १०९४/प्र. क्र. ८/९४/१२.---भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खाली परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "स्वीय सहाय्यक, गट-ब", "उच्चश्रेणी लघुलेखक, गट-ब", "निम्नश्रेणी लघुलेखक, गट ब" आणि "लघु-टंकलेखक, गट क" पदाचे (सेवा प्रवेश) नियम, १९९७ मध्ये सुधारणा करण्याबाबतचे पुढील नियम करीत आहेत :---

१. या नियमांना शासनाच्या बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "स्वीय सहाय्यक, गट-ब", "उच्चश्रेणी लघुलेखक, गट-ब", "निम्नश्रेणी लघुलेखक, गट-ब" आणि "लघु-टंकलेखक, गट क" पदाचे (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, २००३ असे संबोधण्यात यावे.

२. शासनाच्या बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "स्वीय सहाय्यक, गट-ब", "उच्चश्रेणी लघुलेखक, गट-ब", "निम्नश्रेणी लघुलेखक, गट ब" आणि "लघुटंकलेखक, गट क' "पदाचे (सेवा प्रवेश) नियम, १९९७ (यापुढे यास "मूळ नियम" असे संबोधण्यात आले आहे) च्या नियम ४ खंड (ब) च्या उपखंड (३) नंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे :—

(४) "परंतु अगोदरच शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करता येईल.".

३. मूळ नियमाच्या नियम ५ मधील खंड (ब) च्या उपखंड (३) नंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे :—

(४) "परंतु अगोदरच शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करता येईल.".

४. मूळ नियमाच्या नियम ६ मधील खंड (ब) च्या उपखंड (३) नंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे :—

(४) "परंतु अगोदरच शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करता येईल.".

५. मूळ नियमाच्या नियम ८ नंतर खालीलप्रमाणे नियम समाविष्ट करण्यात येत आहे :---

"८अ. नियम ३, ४, ५ व ६ मध्ये नमूद पदांवर नियुक्त व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. बा. नारायणकर,

अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 13th November 2003.

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1094/C.R.8/94/XII.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Personal Assistant Group " B ", Higher Grade Stenographer-Group " B ", Lower Grade Stenographer-Group " B " and Steno-Typist-Group " C " in the various offices of Government outside Greater Mumbai (Recruitment) Rulels 1997, namely :—

1. These rules may be called the Personal Assistant Group " B ", Higher Grade Stenographer-Group " B ", Lower Grade Stenographer-Group " B " and Steno-Typist-Group " C " in the various offices of Government outside Greater Mumbai (Recruitment) (Amendment) Rules, 2003.

2. In rule 4 of the Personal Assistant Group " B ", Higher Grade Stenographer-Group " B ", Lower Grade Stenographer-Group " B " and Steno-Typist-Group " C " in the various offices of Government outside Greater Mumbai (Recruitment) Rules, 1997 (hereinafter referred to as " the principal Rules "), in clause (*b*), after the existing sub-entry (*iii*), the following proviso shall be added, namely :—

(*iv*) " Provided that, in case of candidates, who are already in Government Service, the upper age-limit shall be relaxed by five years.".

3. In rule 5 of the principal Rules, in clause (*b*), after the existing sub-entry (*iii*), the following proviso shall be added, namely :—

(*iv*) "Provided that, in case of candidates, who are already in Government Service, the upper age-limit shall be relaxed by five years.".

4. In rule 6 of the principal Rules, in clause (*b*), after the existing sub-entry (*iii*), the following proviso shall be added, namely :—

(*iv*) " Provided that, in case of candidates, who are already in Governmen Service, the upper age-limit shall be relaxed by five years.".

5. After rule 8 of the principal Rules, the following rule shall be inserted, namely :—

" 8A. A person appointed to any of the posts mentioned in rules 3,4,5 and 6 shall posses a certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information and Technology, Governor of Maharashtra from time to time.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. B. NARAYANKAR,
Under Secretary to Government.

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २००६

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर.१००२/प्र.क्र. २/०२/१४-अ.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) (सेवाप्रवेश) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन असा आहे ;

(क) " शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र " म्हणजे संचालक (परीक्षा), महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांनी दिलेले टंकलेखनाचे प्रमाणपत्र आणि शासनाने ह्या उद्देशांसाठी ज्यास समकक्ष म्हणून घोषित केले आहे, असे अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले प्रमाणपत्र ;

(ड) " गट-ड " म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मध्ये नमूद केलेली गट-ड सेवा ;

(इ) " माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा " म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यामिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.

३. बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल :—

(अ) गट-ड मधील पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि नामनिर्देशाने नियुक्तीकरिता या नियमाच्या खंड (ब) च्या उप खंड (२) व (३) मध्ये विहित केल्यानुसार अर्हता धारण करीत असेल, अशा व्यक्तींची ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नेमणूक करता येईल ; किंवा

(ब) नामनिर्देशनाने आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेद्वारे निवड झालेल्या पुढील व्यक्तींमधून,—

(१) ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत. परंतु ३३ वर्षांपेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तीने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे,

(३) जी व्यक्ती मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

४. लिपिक-टंकलेखक पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेली संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्याच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

५. या पदावरील नेमणूक पदोन्नती आणि नामनिर्देशनाने २५ : ७५ या गुणोत्तराच्या प्रमाणात करण्यात येईल.

६. या नियमांतर्गत पदोन्नतीने अथवा नामनिर्देशनाने लिपिक-टंकलेखक पदी नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :—

(अ) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्या संबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा ;

(ब) हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, ती परीक्षा ;

(क) महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक आणि इंग्रजी टंकलेखक यांच्याकरिता मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखन परीक्षा आवश्यक करण्याबाबत) नियम, १९९१ नुसार विहित केलेल्या व्यावसायिक परीक्षा जर ती व्यक्ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, ती परीक्षा ;

(ड) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची परीक्षा.

७. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेच्या निकडीच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे शासनाचे मत असेल तर, नियम ५ अन्वये पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने भरतीसाठी जे गुणोत्तराचे प्रमाण विहित केले आहे, ते आयोगाच्या सल्ल्याने शिथिल करून, शासन नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक करू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्री. प्र. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जानेवारी २००८

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १४०६/सी.आर. १०२/०६/एक्सआयव्ही (ए).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागातील सहायक (सेवाप्रवेश), नियम १९९५ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, मंत्रालयीन विभागातील सहायक (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००७ असे म्हणावे.

२. मंत्रालयीन विभागातील सहायक (सेवाप्रवेश) नियम, १९९५ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ३ मधील खंड (ग) च्या उपखंड (एक) मध्ये "३०" या आकड्याऐवजी "३३" हा आकडा दाखल करण्यात येईल.

३. मुख्य नियमांतील विद्यमान नियम ५ वगळण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ६ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"६क. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण केले पाहिजे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ग. दळवी,**
शासनाचे उप सचिव.

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013–15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक १७] गुरुवार, फेब्रुवारी १३, २०१४/माघ २४, शके १९३५ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी २०१४.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही-२०१२/प्र. क्र.२२६/१२.— भारतीय संविधानाच्या कलम ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे प्रशासकीय विभागात व प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयात विशेष कौशल्य आवश्यक असलेले, माहिती तंत्रज्ञान तज्ञ, विधि अधिकारी, कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, माध्यम समन्वयक, गट अ, गट ब (राजपत्रित), गट ब (अराजपत्रित) व गट क पदांवर सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे नियम विहित करत आहेत ते असे :—

१. या नियमास प्रशासकीय विभागातील व प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील विशेष कौशल्य आवश्यक असलेले, माहिती तंत्रज्ञान तज्ञ, विधि अधिकारी, कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, माध्यम समन्वयक, गट अ, गट ब (राजपत्रित), गट ब (अराजपत्रित) व गट क (सेवाप्रवेश) नियम, २०१४ संबोधण्यात यावे.

२. हे नियम, प्रशासकीय विभागातील व प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील गट अ, गट- ब (राजपत्रित), गट- ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील पदांच्या सेवाप्रवेश नियमातील संबंधित तरतुदींना या नियमातील तरतुदींच्या मर्यादेपर्यंत अधिभावी (overriding) ठरतील.

३. या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " प्रशासकीय विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या कार्यनियमावलीतील अनुसूचीमध्ये नमूद केलेले प्रशासकीय विभाग ;

(ब) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(क) " माहिती व जनसंपर्क महासंचालनालय " म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ;

(ड) " माहिती तंत्रज्ञान संचालनालय " म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान संचालनालय ;

(इ) " वित्त विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग ;

(फ) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन ;

(ग) " विधी व न्याय विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा विधी व न्याय विभाग.

४. माहिती तंत्रज्ञान तज्ञ, गट अ, गट ब (राजपत्रित), गट ब (अराजपत्रित), गट क पदावरील नियुक्ती खालील मार्गाने करण्यात येईल,—

(अ) खालील अटी पूर्ण करणाऱ्या व या पदावर पदोन्नतीसाठी इच्छुकता दर्शविलेल्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने,—

(१) प्रशासकीय विभागाच्या ज्या संवर्गातील काही पदे माहिती तंत्रज्ञान तज्ञांमधून भरण्यात येणार आहेत त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात, पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण केला आहे ;

(२) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात, पदोन्नतीसाठी विहित केलेला निकटतम निम्न पदावर किमान नियमित सेवा कालावधी व असा कालावधी विहित केला नसल्यास निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केली आहे ;

(३) माहिती तंत्रज्ञान तज्ञ पदावर नियुक्तीसाठी विहित केलेली अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण केला आहे व अन्य बाबींची पूर्तता करत आहे ;

(४) पदोन्नतीच्या पदासाठी विहित केलेला ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता अथवा ज्येष्ठता अधीन पात्रता हा निकष पूर्ण करत आहे,

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळसेवेने,—

(१) ज्यांचे वय शासनाकडून वेळोवेळी स्वतंत्रपणे विहित करण्यात येणाऱ्या कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त नाही;

(२) जे माहिती तंत्रज्ञान तज्ञ पदावर नियुक्तीसाठी वेळोवेळी स्वतंत्रपणे विहित करण्यात येणारी किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता, किमान अनुभव व अन्य बाबी यांची पूर्तता करत आहेत :

परंतु, असे की, सरळसेवेने नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारांना शासनाकडून वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

५. विधि अधिकारी, गट अ, गट ब (राजपत्रित) पदावरील नियुक्ती खालील मार्गाने करण्यात येईल,—

(अ) खालील अटी पूर्ण करणाऱ्या व या पदावर पदोन्नतीसाठी इच्छुकता दर्शविलेल्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने,—

(१) ज्या संवर्गातील काही पदे विधि अधिकारी यामधून भरण्यात येणार आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण केला आहे ;

(२) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात, पदोन्नतीसाठी विहित केलेला निकटतम निम्न पदावर किमान नियमित सेवा कालावधी व असा कालावधी विहित केला नसल्यास निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केली आहे ;

(३) विधि अधिकारी पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेली अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण केला असून अन्य बाबींची पूर्तता करत आहे :

(४) पदोन्नतीच्या पदासाठी विहित केलेला ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता अथवा ज्येष्ठता अधीन पात्रता हा निकष पूर्ण करत आहे,

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,—

(१) ज्यांचे वय, शासनाकडून वेळोवेळी स्वतंत्रपणे विहित करण्यात येणाऱ्या कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त नाही ;

(२) ज्या संवर्गातील काही पदे विधि अधिकारी यामधून भरण्यात येणार आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेली किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि किमान अनुभव धारण केला आहे ;

(३) या पदावर नियुक्तीसाठी विहित करण्यात येणारी अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य आवश्यक बाबी यांची पूर्तता करत आहेत,

किंवा

(क) ज्या संवर्गातील पद विधि अधिकारी यामधून भरण्यात येणार आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात सदर पद स्पर्धा परीक्षेद्वारे वा अन्य निकषावर निवडीने भरण्याची तरतूद असल्यास खालील अटी पूर्ण करणाऱ्या व या पदावर निवडीने नियुक्तीस इच्छुक उमेदवारांमधून निवडीने,—

(१) ज्या संवर्गातील काही पदे विधि अधिकारी यामधून निवडीने भरण्यात येणार आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेली किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता, किमान अनुभव व अन्य बाबींची पूर्तता करत आहेत ;

(२) या पदावर नियुक्तीसाठी विहित करण्यात येणारी अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक बाबी याची पूर्तता करत आहेत.

६. कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक, गट अ, गट ब (राजपत्रित) संवर्गातील पदावरील नियुक्ती खालील मार्गाने करण्यात येईल.—

(अ) खालील अटी पूर्ण करणाऱ्या व या पदावर पदोन्नतीसाठी इच्छुकता दर्शवलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने,—

(१) ज्या संवर्गातील काही पदे कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून भरण्यात येणार आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात, पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित केलेली किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करत आहेत;

(२) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात, पदोन्नतीसाठी विहित केलेला निकटतम निम्न पदावर किमान नियमित सेवा कालावधी व असा कालावधी विहित केला नसल्यास निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केली आहे;

(३) कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक पदावर नियुक्तीसाठी विहित केलेली अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण केला आहे व अन्य बाबींची पूर्तता करत आहेत;

(४) पदोन्नतीच्या पदासाठी विहित केलेला ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता अथवा ज्येष्ठता अधीन पात्रता हा निकष पूर्ण करत आहेत;

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,—

(१) ज्यांचे वय शासनाकडून वेळोवेळी स्वतंत्रपणे विहित करण्यात येणाऱ्या कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त नाही;

(२) ज्या संवर्गातील काही पदे कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून भरण्यात येणार आहेत त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेली किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि किमान अनुभव धारण केला आहे;

(३) या पदावर नियुक्तीसाठी विहित केलेली अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक बाबी याची पूर्तता करत आहेत,

किंवा

(क) ज्या संवर्गातील पद कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून भरण्यात येणार आहेत त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात सदर पद स्पर्धा परीक्षेद्वारे या अन्य निकषावर निवडीने भरण्याची तरतूद असल्यास खालील अटी पूर्ण करणाऱ्या व या पदावर निवडीने नियुक्तीस इच्छुक उमेदवारांमधून निवडीने,—

(१) ज्या संवर्गातील काही पदे कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून निवडीने भरण्यात येणार आहेत त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेली किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि किमान अनुभव धारण केला आहे;

(२) या पदावर नियुक्तीसाठी विहित केलेली अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक बाबी याची पूर्तता करत आहेत;

७. माहिती तंत्रज्ञान तज्ञ पदावर, पदोन्नतीने व सरळसेवेने खुल्या बाजारातून सर्वसाधारणपणे अनुक्रम ४०:६० प्रमाणात नियुक्ती करता येतील :

परंतु, पदोन्नतीसाठी योग्य व इच्छुक अधिकारी / कर्मचारी आवश्यक प्रमाणात उपलब्ध नाहीत अशा परिस्थितीत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या व संबंधित प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने, पदोन्नतीने व सरळसेवेने खुल्या बाजारातून नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून पदोन्नती कोट्यातील पदे सरळसेवेने भरता येतील.

८. (अ) संबंधित संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या कमाल १० टक्के इतकी पदे माहिती तंत्रज्ञान तज्ञ यामधून भरता येतील;

(ब) गट अ, गट ब (राजपत्रित), गट ब (अराजपत्रित) आणि गट क मधील कोणत्या संवर्गातील पदे माहिती तंत्रज्ञान तज्ञ यामधून भरण्यात येतील, ते प्रशासकीय विभागाने वेळोवेळी अधिसूचित करणे आवश्यक राहील :

परंतु, याप्रमाणे अधिसूचित केलेल्या प्रत्येक संवर्गातील, कमाल १० टक्के मर्यादेच्या अधीन राहून किती टक्के पदे माहिती तंत्रज्ञान तज्ञ यामधून भरता येतील, तेदेखील प्रशासकीय विभागाने अधिसूचित करणे आवश्यक राहील.

९. प्रशासकीय विभागात/अधिपत्याखालील कार्यालयात, संबंधित संवर्गातील मंजूर पदसंख्येपैकी किती पदे विधि अधिकारी यामधून भरावयाची ते प्रशासकीय विभागास ठरविता येईल.

१०. प्रशासकीय विभागात किंवा अधिपत्याखालील कार्यालयात, संबंधित संवर्गातील मंजूर पदसंख्येपैकी किती पदे कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून भरावयाची ते प्रशासकीय विभागास ठरविता येईल.

११. (अ) माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ यामधून पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी गट अ, गट ब (राजपत्रित), गट- ब (अराजपत्रित) आणि गट क मधील संवर्गातील पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य बाबी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सहमतीने, प्रशासकीय विभागाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील;

(ब) माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ पदावर, खुल्या बाजारातून (open market) नियुक्त व्यक्तींना लागू होणाऱ्या वेतनश्रेणी किंवा वेतनबँड व ग्रेड पे अथवा अनुज्ञेय मानधन, भत्ते व अन्य शर्ती माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने ठरविण्यात येतील;

(क) अनुज्ञेय वेतनाव्यतिरिक्त अतिरिक्त प्रोत्साहनात्मक भत्ता वित्त विभागाच्या सहमतीने ठरविता येईल.

१२. (अ) विधि अधिकारी पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी गट अ, गट ब (राजपत्रित) मधील संवर्गातील पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य बाबी विधी व न्याय विभागाच्या सहमतीने, प्रशासकीय विभागाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील;

(ब) विधि अधिकारी पदावर नियुक्त व्यक्तीस, आवश्यकता भासल्यास अनुज्ञेय प्रोत्साहनात्मक भत्ता वित्त विभागाच्या सहमतीने ठरविता येईल.

१३. (अ) कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक यामधून पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी गट अ, गट ब (राजपत्रित) मधील संवर्गातील पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य बाबी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सहमतीने, प्रशासकीय विभागाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील;

(ब) कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक पदावर पदोन्नतीने नियुक्त व्यक्तींना, अनुज्ञेय प्रोत्साहनात्मक भत्ता आवश्यक असल्यास, वित्त विभागाच्या सहमतीने ठरविता येईल.

१४. माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञपदांवर पदोन्नतीने नियुक्त व्यक्तीस, विधि अधिकारी, कार्यक्रम अधिकारी, जनसंपर्क अधिकारी किंवा माध्यम समन्वयक या पदांवर पदोन्नतीने, नामनिर्देशनाने अथवा निवडीने नियुक्त व्यक्तीस त्यांची ज्या संवर्गातील पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील अन्य तरतुदीदेखील लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. भगवान सहाय,

शासनाचे प्रधान सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 11th February 2014

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV. 2012/C.R.226/12.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment of Information Technology Expert, Law Officer, Programme Officer, Public Relation Officer, Media Coordinator, requiring special skills, to the Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted) and Group 'C' posts in the Administrative Departments and in the Offices under the Administrative Departments of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Information Technology Expert, Law Officer, Programme Officer, Public Relation Officer, Media Coordinator, requiring special skills, Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted) and Group 'C' in the Administrative Departments and in the Offices under the Administrative Departments of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2014.

2. These rules shall override the concerned provisions in the Recruitment Rules of the posts in Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted) and Group 'C' in the Administrative Departments and in the Offices under the Administrative Departments subject to a limitation of the provisions in these rules.

3. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Administrative Department" means the Administrative Department included in the first Schedule to the Maharashtra Government Rules of Business;

(*b*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission;

(*c*) " Directorate of Information and Public Relation " means the Directorate of Information and Public Relation under the Government of Maharashtra;

(*d*) " Directorate of Information and Technology " means the Directorate of Information and Technology under the Government of Maharashtra;

(*e*) " Finance Department " means the Finance Department of the Government of Maharashtra;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra;

(*g*) " Law and Judiciary Department " means the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra.

4. Appointment to the post of Information Technology Expert, the Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted), Group 'C' shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person from amongst the persons fulfilling the following conditions and willing for promotion to this post, who—

(*i*) possess the prescribed educational qualification and experience provided in the Recruitment Rules of the cadre of Administrative Department from which some posts are to be filled in from the Information Technology Expert ;

(*ii*) having completed the period of minimum regular service in the immediate feeder post as prescribed in the Recruitment Rules of the concerned post and if no such period is prescribed then completed the minimum three years of regular service in the immediate feeder post ;

(*iii*) possess the additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment by direct recruitment to the post of the Information Technology Expert ;

(*iv*) fulfil the criteria of strict selection with due regard to seniority or seniority subject to fitness as prescribed for promotion to the post ;

or

(*b*) by nomination from amongst the candidates, who—

(*i*) are not of the age more than the upper age limit prescribed separately by the Government, from time to time ;

(*ii*) possess the minimum educational qualification, minimum experience and fulfil other conditions prescribed for appointment to the post of Information Technology Expert :

Provided that, the persons appointed by direct recruitment shall be governed by the rules and regulations prescribed by the Government from time to time.

5. Appointment to the post of Law Officer, Group 'A', Group 'B' (Gazetted) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person from amongst the persons fulfilling following conditions and willing for promotion to this post,—

(*i*) possess the prescribed educational qualification, experience provided in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Law Officer ;

(*ii*) having completed the period of minimum regular service in the immediate feeder post as prescribed in the Recruitment Rules of the concerned post and if no such period is prescribed then completed the minimum three years of regular service in the immediate feeder post ;

(*iii*) possess the additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment by nomination to the post of the Law Officer ;

(*iv*) fulfil the criteria of strict selection with due regard to seniority or seniority subject to fitness as prescribed for promotion to the post ;

or

(*b*) by nomination from amongst the candidates, who—

(*i*) are of the age not more than the upper age limit prescribed separately by the Government from time to time ;

(*ii*) possess the educational qualification and experience prescribed in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Law Officer ;

(*iii*) possess the additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment to the post of the Law Officer ;

or

(*c*) by selection of a suitable person from amongst the persons fulfilling the following conditions and willing for selection to this post, if there is a provision of appointment by selection through competitive examination or on other criteria, in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Law Officer who,—

(*i*) possess the prescribed educational qualification and experience in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Law Officer ;

(*ii*) possess the additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment by nomination to the post of the Law Officer.

6. Appointment to the post of Programme Officer, Public Relation Officer or Media Coordinator, Group 'A', Group 'B' (Gazetted) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person from amongst the persons fulfilling the following conditions and willing for promotion to this post who,—

(*i*) possess the prescribed educational qualification and experience provided in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from Programme Officer, Public Relation Officer or Media Coordinator ;

(*ii*) having completed the period of minimum regular service in the immediate feeder post as prescribed in the Recruitment Rules of the concerned post and if no such period is prescribed then completed the minimum three years of regular service in the immediate feeder post ;

(*iii*) possess additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment by nomination to the post of Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator ;

(*iv*) fulfil the criteria of Strict Selection with due regard to seniority or seniority subject to fitness as prescribed for promotion to the post ;

or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not of the age more than the upper age limit prescribed separately by the Government from time to time ;

(*ii*) possess the prescribed educational qualification and experience provided in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator ;

(*iii*) possess the additional educational qualification and experience and fulfil other conditions prescribed for appointment to the post of Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator ;

or

(*c*) by selection of a suitable person from amongst the persons fulfilling the following conditions and willing for selection to this post, if there is a provision of appointment by selection through competitive examination or on other criteria, in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator who,—

(*i*) possess the prescribed educational qualification and experience provided in the Recruitment Rules of the cadre from which some posts are to be filled in from the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator ;

(*ii*) possess the additional educational qualification, experience and fulfil other conditions prescribed for appointment by nomination to the post of Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator.

7. Appointment to the post of Information Technology Expert shall be generally made by promotion and direct recruitment from open market in the ratio of 40 : 60 respectively :

Provided that, if suitable and willing officers or employees are not available in the required proportion, then in such event, the post from promotion quota can be filled in by direct recruitment from open market relaxing the ratio for appointment by promotion and direct recruitment with the prior approval of Directorate of Information Technology and the concerned Administrative Department.

8. (*a*) Maximum 10 per cent posts of the sanctioned cadre strength in the concerned cadre may be filled in from the Information Technology Expert ;

(*b*) Posts from which cadre in Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted) Group 'C'are to be filled in from the Information Technology Expert shall be notified by the Administrative Department, from time to time :

Provided that, from each such notified cadre, subject to a maximum of 10 per cent, the percentage of the posts to be filled in, shall also be notified by the Administrative Department.

9. The number of posts to be filled in from the sanctioned cadre strength in the concerned cadre in Group 'A', Group 'B' (Gazetted), from the Law Officer in the Administrative Department or Offices under the Administrative Department shall be decided by the Administrative Department.

10. The number of posts to be filled in from the sanctioned cadre strength in the concerned cadre Group 'A', Group 'B' (Gazetted), from the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator in the Administrative Department or Offices under the Administrative Department shall be decided by the Administrative Department.

11. (*a*) Necessary educational qualification, experience and other conditions for appointment by direct recruitment from open market to the post of Information Technology Expert in Group 'A', Group 'B' (Gazetted), Group 'B' (Non-Gazetted), Group 'C' posts shall be notified by the Administrative Department from time to time with the concurrence of the Directorate of Information Technology.

(*b*) Pay-Scale or Pay-Band, Grade Pay or entitled honorarium, allowances and other conditions applying to the persons appointed by direct recruitment from open market to the post of the Information Technology Expert shall be decided with the concurrence of the Directorate of Information Technology and the Finance Department of the Government.

(*c*) The additional incentive allowance other than the entitled pay, may be decided with the concurrence of the Finance Department of the Government.

12. (*a*) Necessary educational qualification, experience and other conditions for appointment by nomination to the post of the Law Officer in Group 'A', Group 'B' (Gazetted) posts shall be notified by the Administrative Department from time to time with the concurrence of the Law and Judiciary Department of the Government.

(*b*) Additional incentive allowance if necessary, to the persons appointed by nomination to the post of the Law Officer shall be decided with the concurrence of the Finance Department of the Government.

13. (*a*) Necessary educational qualification, experience and other conditions for appointment by nomination to the post of the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator in Group 'A', Group 'B' (Gazetted) posts shall be notified by the Administrative Department from time to time with the concurrence of the Directorate of Information and Public Relation.

(*b*) Additional incentive allowance if necessary, to the persons appointed by nomination to the post of the Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator shall be decided with the concurrence of the Finance Department of the Government.

14. A person appointed by promotion to the post of Information Technology Expert, a person appointed by promotion or nomination or selection to the post of Law Officer, Programme Officer, Public Relation Officer or Media Co-ordinator shall also be governed by other conditions in the Recruitment Rules of the post in the cadre in which he is appointed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. BHAGWAN SAHAI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक ९] सोमवार, जून ९, २०१४/ज्येष्ठ १९, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २९

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

**राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ९ जून २०१४

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटिफिकेशन-१/४७४/२०१४.— **ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद-५ च्या उप-परिच्छेद (१) नुसार राज्यपाल, संसद अथवा राज्य विधीमंडळांनी पारित केलेला एखादा विशिष्ट कायदा, अनुसूचित क्षेत्र किंवा राज्यातील तत्सम भाग यांना लागू करू नये अथवा अनुसूचित क्षेत्र किंवा राज्यातील तत्सम भाग यांना, अधिसूचनेत विनिर्दिष्टपणे नमूद केलेले अपवाद आणि बदलांच्या अधिन राहून लागू करावा, असे निर्देश जाहीर अधिसूचनेद्वारे देऊ शकतात ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील अनुसूचित क्षेत्रात निम्न मानव विकास निर्देशांक, मागासलेपणा, दुर्गमता, गरिबी दिसून येतात, आणि ज्याअर्थी अनुसूचित क्षेत्राचे सामाजिक निर्देशांक साधारणपणे राज्याच्या सामाजिक निर्देशांकाच्या सरासरीपेक्षा कमी आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ नुसार शासनावर अनुसूचित जमातीचे शैक्षणिक आणि आर्थिक हित विशेष काळजी पूर्वक जोपासण्याचे कर्तव्य सोपविले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे संदर्भावरून, आदिवासी सल्लागार परिषदेने निदर्शनास आणले की, अनुसूचित क्षेत्रात सेवा पुरविण्यातील अडचणी जसे पदे रिक्त राहणे, कर्मचाऱ्यांची कार्यालयातील उपस्थिती कमी प्रमाणात असणे, कर्मचाऱ्यांनी कामात पुरेसा रस न घेणे, कर्मचाऱ्यांना स्थानिक बोलीभाषा अवगत नसणे या असून त्या उपरोक्त बाबरा कारणीभूत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त बाबी लक्षात घेऊन आदिवासी सल्लागार परिषद, महाराष्ट्र यांनी राज्यपाल यांना अधिसूचनेद्वारे तलाठी, सर्वेक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षक, शिक्षक, आदिवासी विकास निरीक्षक, कृषी सहायक, पशुधन सहायक, परिचारिका आणि गट क व गट ड मधील इतर समकक्ष पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकरिता आरक्षित करण्याची शिफारस केली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी अनुसूचित क्षेत्रामधील देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांच्या (Service delivery) दर्जामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने, अनुसूचित क्षेत्रामधील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात गती देण्याकरिता, स्थानिक बोलीभाषा आणि संस्कृती च्या ज्ञानाच्या अभावी निर्माण होणारे संदेशवहनाचे प्रश्न सोडविण्यासाठी, अनुसूचित क्षेत्रामधील विविध संस्थांमध्ये कर्मचारीवृंदाच्या

वारंवार गैरहजर राहण्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या हेतूने आणि अनुसूचित क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या कल्याण आणि प्रगती करिता शासनामार्फत राबविण्यात येणारे महत्त्वाचे कार्यक्रम आणि योजनांच्या अंमलबजावणीच्या दर्जात सुधारणा करण्याकरिता, सरळसेवेने भरण्यात येणारी व या अधिसूचनेच्या जोडपत्रात दिलेली काही विवक्षित पदे अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या स्थानिक उमेदवारांकरिता राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पुढील अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल :—

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद-५, उप परिच्छेद (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे निर्देशित करीत आहेत की, यासंबंधी सध्या अस्तित्वात असलेला कोणताही अन्य कायदा किंवा नियम किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी " महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग) कायदा २००१ (महाराष्ट्र कायदा क्र. ८/२००४) " या कलम ४ आणि त्यासंबंधी तयार करण्यात आलेले अन्य कोणतेही नियम किंवा आदेश या सुधारणेच्या अधीन राहून लागू होतील की महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्ह्यामधील अनुसूचित क्षेत्रामधील या अधिसूचने सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या पदांपैकी सरळसेवेने भरावयाची सर्व पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात यावीत.

परंतु, सदर परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व पदांपैकी एक तृतियांश पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील महिला उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेकरिता " स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार " याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वतः किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत.

## परिशिष्ट

| अनुक्रमांक | पदाचे नाव | विभाग |
|---|---|---|
| १ | तलाठी | महसूल व वन विभाग |
| २ | सर्वेक्षक | महसूल व वन विभाग |
| ३ | ग्रामसेवक | ग्रामविकास विभाग |
| ४ | अंगणवाडी पर्यवेक्षक | महिला व बालविकास विभाग |
| ५ | शिक्षक | शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग किंवा आदिवासी विकास विभाग |
| ६ | आदिवासी विकास निरीक्षक | आदिवासी विकास विभाग |
| ७ | कृषी सहायक | कृषी, दुग्ध विकास, पशुसंवर्धन आणि मत्स्य विभाग |
| ८ | पशुधन सहायक | कृषी, दुग्ध विकास, पशुसंवर्धन आणि मत्स्य विभाग |
| ९ | परिचारिका | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| १० | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | सार्वजनिक आरोग्य विभाग. |

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**परिमल सिंह,**
राज्यपालांचे उप सचिव.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-1

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ३३] गुरुवार, ऑगस्ट १४, २०१४/श्रावण २३, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये १७.००

असाधारण क्रमांक ९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

**OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA**

**Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai 400 035, dated the 14th August 2014.**

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RB/TC/e-13013(4)/Notification-2/474/2014/730.—Whereas, by Notification, No. RBTC e-13013(4)/Notification-1/474/2014, dated the 9th June 2014 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-paragraph (1) of paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra directed that, section 4 of the Maharashtra State Public Services (Reservation for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Special Backward Category and Other Backward Classes) Act, 2001 (Mah. VIII of 2001) and any other Rules, or Orders made in this regard, shall notwithstanding anything contained in any other law or rule or order for the time being in force in that regard, apply to the posts specified in the Appendix to the said Notification, subject to the modification that said such posts which are to be filled in by direct recruitment for the Scheduled Areas of the Districts which have Scheduled Areas, in the State of Maharashtra shall be filled in by the local Scheduled Tribe candidates only, having requisite qualification.

And whereas, it is expedient to issue similar directions in respect of the post of Forest Guard under the Revenue and Forests Department, which are to be filled in by direct recruitment for the Scheduled Areas of the Districts which have Scheduled Areas, in the State;

And whereas, it is expedient to amend the said Notification for the said purpose and for certain other purposes;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-paragraph (1) of paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby amends the said Notification, as follows, namely:—

In the Appendix to the said Notification,—

(*a*) for entry 8, the following entry shall be substituted, namely:-

"8. Livestock Supervisor ..Rural Development Department";

(*b*) the following entry shall be added at the end, namely:-

"11. Forest Guard ..... Revenue and Forests Department.".

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Secretary to Governor.

**RNI No. MAHENG /2009/35528**
**Reg. No. MH/MR/South-344/2014-16**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ३८] शुक्रवार, ऑक्टोबर ३१, २०१४/कार्तिक ९, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक ९९**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

**OFFICE OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA**

Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai 400 035, dated the 31st October 2014

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RB/TC/e-11019(16)(2014)/Notification-5/1122/2014.—Whereas, by Notification, No. RBTC/e-13013(4)/Notification-1/474/2014, dated the 9th June 2014 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-paragraph (1) of Paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra, directed that, section 4 of the "Maharashtra State Public Services [Reservation for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-Notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Special Backward Category and Other Backward Classes] Act, 2001 (Mah. VIII of 2001) and any other Rules or Orders made in this regard, shall notwithstanding anything contained in any other law or rule or order for the time being in force in that regard, apply to the posts specified in the Appendix to the said Notification, subject to the modification that said such posts which are to be filled in by direct recruitment for the Scheduled Areas of the Districts which have Scheduled Areas, in the State of Maharashtra shall be filled in by the local Scheduled Tribe candidates only, having requisite qualification;

And whereas, it is expedient to issue similar directions in respect of the post of Kotwal under Revenue Department, which are to be filled in by direct recruitment for the Scheduled Areas of the Districts which have Scheduled Areas, in the State;

And whereas, it is expedient to further amend the said Notification for the said purpose and for certain other purposes;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-paragraph (1) of paragraph 5 of the Fifth Schedule to the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby amends the said Notification, as follows, namely :—

In the Appendix to the said Notification,—

(*a*) for entry 5, the following entry shall be substituted, namely:—

"5. Teacher ...

(*i*) Rural Development Department,

(*ii*) Tribal Development Department ";

(*b*) for entry 9, the following entry shall be substituted, namely:—

"9. Auxiliary Nurse and Midwife (ANM) ....

Rural Development Department";

(*c*) for entry 10, the following entry shall be substituted, namely:—

"10. Multi-Purpose Health Worker (MPW) ....

(*i*) Rural Development Department,

(*ii*) Public Health Department ";

(*d*) the following entry shall be added at the end, namely :—

"12. Kotwal .... Revenue and Forest Department".

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Secretary to Governor.

# अनुकंपा नियुक्ती

भाग
१७

**शासकीय सेवेत असताना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय क्रमांक.अकंपा- १०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर १९९४

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. अकंपा- १०८४/१८०/सीआर . १५५/तेरा-अ, दिनांक ८ मार्च, १९८५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक. अकंपा-१०८८/९१२/प्र.क्र. १६९/आठ, दिनांक ६ ऑक्टोबर, १९८९

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. अकंपा -१०९०/६०५/प्र.क्र. ९०/आठ, दिनांक २८ जून, १९९१

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. अकंपा -१०९१/१६३१/प्र.क्र.५०/९१/आठ, दिनांक ६ ऑक्टोबर १९९३

**शासन निर्णय**

शासकीय सेवेत असताना बेपत्ता, दिवंगत झालेल्या किंवा क्षय/कर्करोग इत्यादी गंभीर आजारांमुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांस नेमणूक देण्यासंबंधीची अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची योजना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. एसआरव्ही-१०७६/१२, दि. २३ एप्रिल १९७६ अन्वये कार्यान्वित करण्यात आली व त्यात वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्यात आले. अनुकंपा तत्वावर नियुक्तीसंबंधात केंद्र शासनाचे धोरण व विविध न्यायालयीन/न्यायाधिकरणाचे यासंबंधात देण्यात आलेले निर्णय व या योजनेच्या अंमलबजावणीसंबंधात आलेल्या प्रशासकीय अडचणी लक्षात घेऊन या योजनेचा पुनर्विचार करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार यापूर्वी अनुकंपा योजनेसंबंधी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन ही योजना सुधारित या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात आणण्यात यावी.

२. या योजनेचे नियम हे सोबतच्या परिशिष्टानुसार असतील.

३. मृत कुटुंबियांच्या व्यक्तींनी करावयाचा अर्ज व तत्संबंधीची माहिती परिशिष्ट "ब" नुसार असेल.

४. सुधारित योजना अंमलात आल्यामुळे ज्या प्रकरणी यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे, अशी प्रकरणे पुनर्विचारार्थ घेण्यात येऊ नयेत. मात्र १ जानेवारी १९८९ नंतर ज्यांचे निधन झाले आहे अशा कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय, जर त्यांनी अनुकंपातत्वावरील नियुक्तीसाठी यापूर्वी विहित मुदतीत अर्ज केले असतील व त्यांची विनंती त्यावेळच्या आदेशानुसार तपासून अमान्य करण्यात आली असेल तर असे कुटुंबीय सुधारित योजनेच्या आधारे पूर्वीच्या अर्जाचा संदर्भ देऊन नव्याने अर्ज देऊ शकतील. मात्र कार्यालयाने/विभागाने अशा प्रकरणी फेरतपासणी करणे अभिप्रेत नाही.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं. ४३७/९४/सेवा-५, दिनांक २७ सप्टेंबर १९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

शांता शास्त्री
प्रधान सचिव (सेवा)
महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट "अ"

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा- १०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ
दिनांक २६ ऑक्टोबर १९९४.

**अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावली.**

१. महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व कार्यालयात अनुकंपा कारणास्तव करावयाच्या नेमणूकांना हे नियम लागू राहतील.

२. खालील प्रकारांमध्ये मोडणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे (रुपांतरित स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी धरुन)

३. (अ) येथील नातेवाईक या नियमानुसार अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नेमणुकीसाठी पात्र असतील :-

(अ) शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेले कर्मचारी,

(ब) क्षय, कर्करोग इत्यादी गंभीर आजारामुळे, सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार अकाली निवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी.

(क) मानसिक किंवा शारीरिक विकलांगता आल्याने, सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने पुढील सेवेसाठी अक्षम ठरविल्याने अकाली निवृत्त करण्यात आलेले किंवा वरील कारणास्तव सेवेतून काढून टाकण्यात आलेले कर्मचारी,

(ड) शासकीय सेवेत कर्तव्य बजावीत असताना अपघाताने अपंग झालेले परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ मधील नियम ७२(३) अनुसार पर्यायी पद देऊ करुनही ते न स्वीकारता सेवानिवृत्ती स्वीकारणारे कर्मचारी.

३. (अ) दिवंगत/अकाली निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांची पती/पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी अथवा मृत्यूपूर्वी/अकाली सेवानिवृत्ती पूर्वी कायदेशीर रीत्या दत्तक घेतलेला/घेतलेली मुलगा/अविवाहित मुलगी ही नियमांनुसार नेमणुकास पात्र नातेवाईक मानण्यात येतील. याशिवाय अन्य कुठल्याही नातेवाईकास या योजनेचा फायदा मिळणार नाही.

(ब) सदर नेमणूक शासकीय कर्मचाऱ्याच्या फक्त एकाच नातेवाईकास देता येईल.

४. (अ) अनुकंपा तत्वावर संबंधित नातलगाची शैक्षणिक पात्रता व वयानुसार राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट "क" व गट "ड" श्रेणीच्या सरळ सेवा प्रवेशाने भरल्या जाणाऱ्या पदावर नियुक्ती करता येईल. हया नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेस बसण्याची आवश्यकता नाही. तसेच वरील नियमानुसार सदर पदांवर नेमणूक करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्याची आवश्यकता नाही. मात्र, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पोलीस उप निरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, मोटार वाहन उप निरीक्षक, रेंज वन अधिकारी, कनिष्ठ अभियंता, सहायक वैद्यकीय अधिकारी इत्यादी गट "क" मधील कार्यकारी (एक्झिक्युटिव्ह) पदांवर तसेच मंत्रालयातील सहायक पदांवर नियुक्ती देता येणार नाही.

(ब) संबंधित पदांसाठी विहित शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणुकांसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. परंतु उच्च वयोमर्यादेची अट राहणार नाही.

(क) तथापि, दिवंगत/अकाली निवृत्त कर्मचाऱ्याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्याबाबतीत गट "ड" मध्ये नेमणुकीसाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करता येईल.

५.(अ) अनुकंपा कारणास्तव नेमणुकीसाठीचा अर्ज शासकीय कर्मचारी दिवंगत/अकाली निवृत्त झालेल्या दिवसापासून ५ वर्षांचे मुदतीत करणे आवश्यक असेल.

(ब) दिवंगत/अकाली निवृत्त कर्मचारी ज्या कार्यालयात काम करीत होता, त्या कार्यालयातील संबंधित नियुक्ती प्राधिकारी या नियमानुसार नेमणुक देण्यास सक्षम राहील. त्यासाठी त्याने निवड समितीचा सल्ला घेणे आवश्यक नाही. मात्र नातेवाईकाने सदर प्राधिकरणाकडे उपरिनिर्दिष्ट मुदतीत नेमणुकीसाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

६.(अ) संबंधित कार्यालयात आवश्यक पद उपलब्ध नसेल तर कार्यालय प्रमुखाने त्या जिल्हयातील/विभागातील इतर कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे संपर्क साधावा व ज्या कार्यालयात आवश्यक पद उपलब्ध असेल त्या कार्यालयामध्ये नियुक्तीसाठी विचार करावा.

(ब) जे कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख त्यांच्या कार्यालयात/विभागात उपलब्ध असलेल्या पदांची माहिती या माहितीची विचारणा करणाऱ्या कार्यालय प्रमुखास/विभाग प्रमुखास देणार नाहीत, अशा कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(क) सर्व कार्यालय प्रमुखांनी/विभाग प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयात/विभागात अनुकंपा तत्वावर नियुक्ती करता आलेल्या एकूण अर्जांची संख्या प्रत्यक्षात नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या, तसेच अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता संबंधित कार्यालयात/विभागात नियुक्ती केलेल्या/प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेदवारांची माहिती सोबतच्या "क" विवरणपत्रात संबंधित प्रशासकीय विभागांकडे दर ६ महिन्यांनी पाठविणे बंधनकारक राहील. या नियमानुसार असा ३१ डिसेंबर १९९३ ची स्थिती दर्शविणारा सहामाही अहवाल १५ जानेवारी १९९५ पर्यन्त पाठवावा.

७. (अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही.

(ब) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उद्भवणाऱ्या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत.

एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापि तो त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

यासंदर्भात नियुक्ती अधिकाऱ्याने मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता दायित्व, गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे.

८. उपरोक्त ४(क) व्यतिरिक्त कोणत्याही अटी शिथिल करण्याची शक्ती शासनाकडे राहणार नाही.

## परिशिष्ट "ब"

शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या/वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र

भाग-१

१. (अ) दिवंगत/वैद्यकीय कारणास्तव/अकाली सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव:
(ब) कर्मचा-याचे पदनाम :
(क) जन्म दिनांक :
(ड) मृत्यूचा/वैद्यकीय कारणासाठी अकाली सेवानिवृत्तीचा दिनांक :
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक :

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नाव :
(ब) त्याचे/तिचे कर्मचा-याशी नाते :
(क) जन्म दिनांक :
(ड) शैक्षणिक अर्हता :
(इ) कुटुंबियांपैकी दुस-या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ?

३. स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम :
(अ) कुटुंब निवृत्तिवेतन :
(ब) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न :
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान :
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत :
(इ) ठेव संलग्न विमा योजना :
(फ) गट विमा योजना :
(ग) आयुर्विम्यापी रक्कम :
एकूण रक्कम :

४. शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्यांचे मासिक उत्पन्न याबाबतची माहिती)

| अनुक्रमांक (१) | नाव (२) | शासकीय कर्मचा-याशी नाते व वय (३) | नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्यांचे मासिक उत्पन्न (४) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

### प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे ख-या आहेत. वरील बाबींपैकी एक बाब जर भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक : उमेदवाराची सही.

श्री./श्रीमती हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत.

दिनांक : स्थायी शासकीय कर्मचा-याची सही, नांव व पत्ता

भाग-२

१. (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नाव :

(ब) त्यांचे/तिचे शासकीय कर्मचा-याशी नाते :

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास) :

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नाव :

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक :

३. विभाग प्रमुख/विभागाची शिफारस :

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्याचा खुलासा :

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत.

दिनांक :

आस्थापना अधिका-याची सही,
नाव व पत्ता

"क" विवरणपत्र

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र. ९०/९३/८, दिनांक २६ ऑक्टोबर १९९४ अन्वये प्रशासकीय विभागांना सादर करावयाचा सहामाही तपशील

विभाग/कार्यालयाचे नांव :------------------------------------------------------------

| अनुक्रमांक | मागील सहामाहीत प्रलंबित असलेल्या अर्जाची संख्या | नवीन अर्जाची संख्या | एकुण | नियुक्ती दिलेल्या अर्जाची संख्या | नियुक्ती नाकारलेल्या अर्जाची संख्या | एकुण प्रलंबित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |

शासकीय सेवेत असताना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वा नियुक्ती देणेबाबत.

---

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ११ सप्टेंबर, १९९६

वाचा : १] शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६.१०.१९९४

२] शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ, दिनांक २३.८.१९९६

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६.१०.१९९४ नुसार अनुकंपा तत्वावर नियुक्तीची सुधारीत योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या शासन निर्णयासोबत परिशिष्ट "अ" मधील नियम ५-अ खाली पुढील परंतुक समाविष्ट करण्यात यावे.

" सेवेत असताना दिवंगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे, १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा." हे आदेश १ मार्च, १९९६ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ य. मा. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक अकंपा-१०९६/प्र.क्र.६७/९६/आठ,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २० डिसेंबर,१९९६.

वाचा :- १] शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३,/आठ, दिनांक २६ ऑक्टोबर,१९९४.

२] शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ आठ,दिनांक २३ ऑगस्ट,९६.

३] शासन शुध्दीपत्र,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ,दिनांक ११ सप्टेंबर,९६

४] शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ,दिनांक २७ सप्टेंबर,९६.

## शासन निर्णय

अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भात असलेल्या काही निर्बंध असल्यामुळे उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना कार्यकारी पदावर नियुक्त्या देण्यांत अडचणी उद्भवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यासंबंधी सुस्पष्ट आदेश काढण्याचा प्रस्ताव काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत सर्वंकष विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील अन्य गट "क" मधील कार्यकारी पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात यावी. सोबतचे. [उदाहरणादाखल काही पदांची यादी सोबत जोडली आहे.] मात्र अशी नियुक्ती ही त्या पदांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरतीची तरतूद आहे अशाच पदांवर देण्यात यावी.

२. वरील आदेश,आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि यापूर्वी गट "क" मधील कार्यकारी पदांवर या योजनेंतर्गत काही नियुक्त्या केल्या असल्यास

त्या बाधीत होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल-यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ प.मा.जोशी ]
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

निवड मंडळाच्या कक्षेतील रु. १२००/- व त्याहून अधिक वेतनश्रेणी असलेले संवर्ग [कार्यकारी पदे]

| | | |
|---|---|---|
| १] | वरिष्ठ लिपिक | रु. १२०० - २०४० |
| २] | वरिष्ठ सहाय्यक | रु. १४०० - २३०० |
| ३] | अल्पबचत अधिकारी | रु. १६४० - २००० |
| ४] | वरिष्ठ समाजकल्याण निरिक्षक | रु. १६४० - २९०० |
| ५] | रचना सहायक | रु. १४०० - २३०० |
| ६] | कनिष्ठ अभियंता | रु. १६४० - २९०० |
| ७] | सांख्यिकी सहायक | रु. १२०० - २००० |
| ८] | दुग्धम निदेशक | रु. १२०० - २०४० |
| ९] | लेखापाल | रु. १६४० - २९०० |
| १०] | सहकार अधिकारी | रु. १६४० - २९०० |
| ११] | विस्तार अधिकारी [कृषि] | रु. १६०० - २६६० |
| १२] | लेखा परीक्षक | रु. १६४० - २९०० |
| १३] | विस्तार अधिकारी [पंचायत] | रु. १४०० - २३०० |
| १४] | विस्तार अधिकारी [शिक्षण] | रु. १६४० - २९०० |

शासकीय सेवेत असतांना दिवंगत / अकाली
सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास
अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत -
विहित संगणक ज्ञानाची अर्हता प्राप्त
करण्याविषयी

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- अकंपा-१०००/प्र.क्र.५९/२०००आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २४ सप्टेंबर, २००१

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अकंपा-१०९३/२३३५/ प्र.क्र.९०/९३ /आठ, दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८ मार्च, २००१

(३) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/बारा, दिनांक २५ जानेवारी, १९९९

(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/बारा, दिनांक ३ मे, २०००

(५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रशिक्षण-२०००/१४३/एकोणचाळीस, दिनांक १० जुलै, २०००

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रशिक्षण-२००१/प्र.क्र.६१/२००१/एकोणचाळीस, दिनांक ७ ऑगस्ट, २००१

## शासन निर्णय

शासकीय सेवेत असतांना दिवंगत / अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची सुधारित योजना, संदर्भाधीन नमूद केलेल्या दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करुन दिनांक २८ मार्च, २००१ च्या शासन निर्णयान्वये त्यात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

२. शासन सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी संगणक हाताळणे / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक असल्याची तरतूद संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २५ जानेवारी, १९९९ रोजीच्या अधिसूचनेव्दारे विहित केली आहे. सदर तरतूद अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबत सुध्दा लागू आहे. तथापि, अनुकंपा तत्वावर देण्यात येणारी नियुक्ती ही अन्य नियुक्तीपेक्षा अत्यंत वेगळ्या परिस्थितीत दिली जात असल्यामुळे अशा नियुक्त्यांबाबत संगणक अर्हता प्राप्त करण्यासाठी काही सवलत देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार माहिती तंत्रज्ञान संचालनालयाशी विचारविनिमय करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून शासन सेवेतील गट 'क' मधील (वाहनचालक वगळून) संबंधित पदाकरिता महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / व

वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी'... उमेदवारांनी खालील 'अ' किंवा 'ब' प्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचे वेळी धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता गट 'क' मधील पदावर (वाहनचालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहित संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिकाऱ्यांना सादर करावे, अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्तीच्या आदेशात नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी नमूद करावी.

४. यापूर्वी ज्या उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आली आहे परंतु ज्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता प्राप्त केलेली नाही, अशा गट 'क' मधील (वाहनचालक वगळून) कर्मचाऱ्यांबाबत या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ३ मे, २००० च्या शासन निर्णयामधील परिच्छेद ३, दिनांक १० जुलै, २००० च्या शासन निर्णयातील परिच्छेद २०, आणि दिनांक ७ ऑगस्ट, २००१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १, २ व ३ अनुसार त्यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २००२ पर्यंत संगणक हाताळणी वापराबाबतचे प्रशिक्षण पूर्ण करुन त्यासंदर्भातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

५. सदर आदेश दिनांक १ जानेवारी, २००१ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

६. सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी गट 'क' मधील (वाहनचालक वगळता) पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना वरील निदेशांचे काटाक्षाने पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्रकाश लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना.**

**प्रचलित कार्यपध्दती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:अकंपा-१००४/प्र.क्र.५५/२००४/आठ
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:२२ ऑगस्ट,२००५

संदर्भ:- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक: २६ ऑक्टोबर,१९९४

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक १२ मार्च,१९९७

३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८ ऑगस्ट,२००१

४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, दिनांक ३० जानेवारी,२००४

शासकीय कर्मचारी सेवेत असतांना दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजारामुळे/अपघातामुळे शासकीय सेवा करण्यास वैद्यकीयदृष्टया कायमचे असमर्थ ठरुन रुग्णता निवृत्त झाल्यास त्यांच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आपत्तीत कुटुंबियांना त्वरीत सहाय्य व्हावे ह्या उद्देशाने प्रथम १९७६ मध्ये अनुकंपा नियुक्तीची योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा वेळोवेळी आढावा घेवून मार्च,१९८५ तसेच ऑक्टोबर,१९९४ मध्ये योजनेत सुधारणा करण्यात आल्या.

संदर्भाधीन क्रमांक:१ येथील दिनांक २६ ऑक्टोबर,१९९४ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीची सुधारीत योजना अमलात आली. त्यानुसार अनुकंपा धारकांना नियुक्ती देण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यामुळे नियुक्ती अधिकाऱ्यांकडेच गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्तीसाठी प्रतिक्षासूची ठेवण्यात येत होत्या. मात्र सर्वच कार्यालयांमध्ये रिक्त पदे उपलब्ध होण्याचे प्रमाण त्याप्रमाणात नव्हते. तसेच त्यात सुसूत्रता नव्हती. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील अनुकंपा नियुक्त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी तसेच सर्वच अनुकंपा धारकांस नियुक्तीच्या समान संधी मिळाव्यात, त्यास विलंब होवू नये या कारणासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्ह्यातील सर्व कार्यालयातील अनुकंपाधारकांची गट 'क' व 'ड' ची स्वतंत्र परंतु सामायिक प्रतिक्षासूची ठेवावी व जिल्ह्यातील सर्व कार्यालयात उपलब्ध होणाऱ्या पदांवर संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार या सामायिक सूचीतील अनुकंपाधारकांची शिफारस करावी अशा स्वरुपाची कार्यपध्दती संदर्भाधीन क्रमांक:२ येथील दिनांक १२ मार्च,१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केली होती. तथापि, या कार्यपध्दतीतही नियुक्त्यांना विलंब होतो तसेच उपलब्ध होणाऱ्या पदांची मर्यादा इत्यादी कारणास्तव या कार्यपध्दतीत बदल करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

मा.सर्वोच्च न्यायालयांनी दिलेल्या विविध निर्णयांनुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" होत नाही. कुटुंबाची अत्यंत हलाखीची स्थिती असल्यास अगदी अपवादात्मक परिस्थितीतच विहित कार्यपध्दतीशिवाय अनुकंपा नियुक्ती करता येईल तसेच काही कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहत नाही अशा आशयाचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय विचारात घेवून अनुकंपा नियुक्तीच्या प्रचलित पध्दतीत काही सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. संदर्भाधीन क्रमांक:१ येथील दिनांक २६ ऑक्टोबर,१९९४ च्या शासन निर्णयाप्रमाणेच संदर्भाधीन क्रमांक:३ येथील दिनांक २८ मार्च,२००१ च्या शासन निर्णयानुसार विहित अटींचे पुनरावलोकन करुन

सुधारणा करण्याचे देखील शासनाच्या विचाराधीन होते. या सर्व बाबींचा विचार करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**शासन निर्णय**

१. संदर्भाधीन क्रमांक:२ येथील शासन निर्णय,दिनांक १२ मार्च,१९९७ अन्वये विहित केलेल्या, जिल्ह्यात सर्व शासकीय कार्यालयांतील पात्र उमेदवारांची अनुकंपा नियुक्त्यांसाठी संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे गट 'क' व 'ड' साठी आणि बृहन्मुंबईतील कार्यालयांसाठी गट 'क' करिता सामान्य प्रशासन विभागाकडे सामायिक प्रतिक्षासूची ठेवण्याच्या सध्याच्या विहित कार्यपध्दतीत अंशत: सुधारणा करुन जिल्हाधिकाऱ्यांकडील अशा सामायिक प्रतिक्षासूचीबरोबरच संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता गट 'क' व 'ड' करिता प्रतिक्षासूची ठेवण्याची दुहेरी प्रतिक्षासूचीची कार्यपध्दती अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासंबंधी कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात यावी:-

(अ) जिल्हाधिकाऱ्यांकडे/सामान्य प्रशासन विभागाकडे असलेल्या सध्याच्या सामायिक प्रतिक्षासूची ह्या अनुकंपा नियुक्त्यांच्या समन्वयासाठी आणि आढाव्यासाठी यापुढेही तशाच चालू ठेवाव्यात. मात्र सामायिक प्रतिक्षा सूचीत समाविष्ट असलेले उमेदवार मूळ ज्या ज्या कार्यालय/विभागांकडून आले होते त्यांची नावे त्या त्या संबंधित मूळ कार्यालय/विभाग यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट 'क' आणि 'ड' मधील पदांवर नियुक्तीसाठी स्वतंत्र प्रतिक्षासूची ठेवण्यासाठी कळवावीत. ही नावे मूळ कार्यालयांना परत कळवितांना त्यांचा परस्पर क्रम हा मूळ प्रतिक्षासूचीनुसार असावा. उदा: सामायिक सूचीत क्र.७,१३,२१ येथील उमेदवार एकाच कार्यालयाचे असतील तर त्या कार्यालयास नावे परत कळवितांना क्र.७ येथील उमेदवार पहिला; क्रमांक १३ येथील उमेदवार दुसरा व क्रमांक २१ येथील उमेदवार तिसरा याप्रमाणे यादी करुन ती मूळ विभागास कळवावी.

सर्व जिल्हाधिकारी/सामान्य प्रशासन विभाग यांनी सदर कार्यवाही एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावी.

(आ) गट 'क' तसेच गट 'ड' मधील पदांवर नियुक्तीसाठीच्या सामायिक प्रतिक्षासूचीतील उमेदवारांच्या वरीलप्रमाणे दोन वेगवेगळया याद्या करुन मूळ विभाग/कार्यालयांना कळवाव्यात.

(इ) मूळ विभाग/कार्यालयास जिल्हाधिकाऱ्यांकडून अशा याद्या प्राप्त झाल्यावर गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख इत्यादी) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' व 'ड' च्या रिक्त पदांवर पदासाठी विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना या यादीतील क्रमानुसार नियुक्त करु शकतील. मात्र उमेदवारांच्या नियुक्त्या केल्यानंतर त्या उमेदवारांची नावे जिल्हाधिकाऱ्यांकडील सामायिक प्रतिक्षासूचीतून वगळण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना लगेच कळवावीत.

बृहन्मुंबईतील गट 'क' मधील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांचेकडील नियुक्त्यांबाबतची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन १४-अ ला कळवावी.

(उ) यापुढे अनुकंपाची प्रकरणे ज्या कार्यालयात/विभागात होतील त्या प्रकरणांच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांची नावे संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याकडील गट 'क' व 'ड' प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यात यावीत. त्याचप्रमाणे ज्या तारखेस अशी नावे कार्यालयाच्या प्रतिक्षासूचीवर घेण्यात येतील त्याच तारखेपासून त्यांची नावे संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडील सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावीत.

बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांचेकडील गट 'क' च्या प्रतिक्षासूची/नियुक्त्यांबाबत वरीलप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन १४-अ ला कळवावे.

(ए) जिल्हाधिकाऱ्यांकडे/सामान्य प्रशासन विभागाकडे वरीलप्रमाणे समन्वयाचे कामासाठी ठेवलेल्या सामायिक सूचीत याप्रमाणे जिल्ह्यातील विविध कार्यालयांकडून येणारी नवीन नावे मूळ कार्यालयांच्या प्रतिक्षासूचीत समाविष्ट केलेल्या दिनांकानुसार गट 'क' व 'ड' च्या सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करावीत.

(ओ) ज्या कार्यालयात अनुकंपाधारक नियुक्तीच्या प्रतिक्षेत नाहीत, परंतु गट 'क' किंवा 'ड' मध्ये रिक्त पदे उपलब्ध आहेत त्यांनी त्यांचेकडे वर्षात रिक्त झालेल्या/होणाऱ्या गट 'क' व 'ड' मधील पदांपैकी ५% पदे अनुकंपा धारकांनी भरण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणीपत्र पाठवावे. अशी मागणीपत्रे पाठवितांना संबंधित कार्यालयाने त्यांचेकडे संबंधित पदांवर नियुक्ती देण्यासाठी अनुकंपाधारक त्या कार्यालयात उपलब्ध नाहीत असे प्रमाणित करावे.

अनुकंपा नियुक्तीसाठी आता वरीलप्रमाणे गट 'क' आणि 'ड' मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५% पदांची मर्यादा विहित केली असल्याने संदर्भाधीन क्रमांक:४ येथील दिनांक ३० जानेवारी,२००४ च्या आदेशातील परिच्छेद ३ मधील निदेश आता वरीलप्रमाणे सुधारीत झाल्याचे समजण्यात यावे.

(क) हे आदेश निर्गमित होण्यापूर्वी पूर्वीच्या कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी सामायिक प्रतिक्षासूचीतून जर काही उमेदवारांची शिफारस केली असेल आणि त्यांच्या नेमणुका अद्याप व्हावयाच्या असतील तर त्यात कोणताही बदल न करता अशा उमेदवारांच्या नियुक्तीची प्रक्रिया संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांनी पूर्ण करावी.

(ख) या आदेशाच्या पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे काही रिक्त पदांची मागणी प्राप्त झाली असल्यास अशा प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी प्रथम सामायिक सूचीतून सुयोग्य उमेदवारांची शिफारस करावी व त्यानंतर उर्वरित प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची नावे संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांना पाठवावीत.

(ग) वरील (क) तसेच (ख) बाबत जिल्हाधिकारी त्यांचेकडील सामायिक सूचीतील पात्र उमेदवारांची त्या कार्यालयात नियुक्तीसाठी शिफारस करील व अशा उमेदवाराचे नाव कळविताना मूळ कार्यालयास त्याचे नाव त्या कार्यालयाच्या प्रतिक्षासूचीतून वगळण्यास कळविल.

बृहन्मुंबईतील कार्यालयांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ ) यांचेकडून करण्यात यावी

सर्व जिल्हाधिकारी तसेच सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांनी प्रत्येक ६ महिन्यांनी जानेवारी आणि जुलै मध्ये त्यांचेकडील सामायिक प्रतिक्षासूचीचा आढावा घेवून दरम्यानच्या कालावधीत नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांची नावे वगळून त्यांचेकडील सामायिक प्रतिक्षासूची अद्ययावत करतील. यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयातील प्रतिक्षासूच्यांचा आढावा घेवून समन्वयाचे काम करतील.

२. याशिवाय अनुकंपा योजनेच्या सध्याच्या प्रचलित तरतुदीत खालीलप्रमाणे सुधारणा सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून करण्यात येत आहेत.:-

(१) गट 'क' व 'ड' मधील कर्मचारी कर्करोग,पक्षाघात किंवा अपघात यामुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरुन रुग्णता निवृत्त झाल्यास त्याच्या कुटुंबियांना गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्ती देण्याची सवलत रद्द करण्यात येत आहे. यापुढे केवळ सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट 'क' व 'ड' च्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील.

(२) यापुढे वयाच्या ४० वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीत नव्याने समाविष्ट होणाऱ्या उमेदवारांना वयाच्या ४० वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४० वर्षे पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेवून सूचीतून काढून टाकण्यात यावीत.

(३) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबियांकडून संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्याची सध्याची ५ वर्षांची मुदत कमी करुन कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहील.

३. वरील सुधारणांव्यतिरिक्त अनुकंपा नियुक्तीच्या योजनेतील प्रचलित इतर तरतुदी यापुढेही कायम राहतील.

४. सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी/जिल्हाधिकाऱ्यांनी अनुकंपा नियुक्तीच्या योजनेतील वरील बदल लक्षात घेवून अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबियांचा त्यांचेकडील प्रतिक्षासूचीत समावेश करतांना योग्य उमेदवारांचा सूचीत समावेश होईल याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांचेकडील अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे निकाली काढावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

न. कुमार.

( नविन कुमार )
अपर मुख्य सचिव (सेवा)
सामान्य प्रशासन विभाग

नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जायबंदी/मृत्यू झालेल्या शासकीय सेवेतील व्यक्तीच्या कुटुंबियांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत.

अनुकंपा नियुक्तीच्या योजनेत सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक :-अकंपा-१००६/प्र.क्र.१७४/०६/आठ

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,दिनांक :- १७.७.२००७

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६ ऑगस्ट, १९९४

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक ११ मार्च, १९९७

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८ मार्च, २००१

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, दिनांक ३० जानेवारी, २००४

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट, २००५

नक्षवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात जायबंदी/ठार झालेल्या शासकीय सेवेतील कुटुंबियांस शासन नोकरीत सामावून घेण्याबाबत व प्रचलित तरतूदीत काही सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यामध्ये नक्षवाद्यांच्या हल्ल्यात जायबंदी/ठार झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी वेगळी आरक्षण श्रेणी निर्माण करावी काय , तसेच गट 'अ' व गट 'ब' मधील कर्मचाऱ्यांचा सेवेत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना अनुकंपा नियुक्तीचा लाभ द्यावा काय, प्रचलित पध्दतीप्रमाणे अनुकंपा नियुक्तीसाठी गट 'क' व 'ड' मधील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५ टक्के विहित केलेली पदांची मर्यादा वाढवावी काय, अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कुटूंबियांमध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांमध्ये घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा मुलींना/बहिणींना पात्र कुटूंबिय म्हणून समाविष्ट करावे काय, प्रचलित तरतूदीनुसार वयाची ४० वर्षे झालेल्या कुटूंबियांस अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यासाठी अट कर्मचाऱ्यांच्या विधवा तसेच घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा मुलगी/बहीणी यांच्याकरीता शिथिल करावी काय. याबाबतचे प्रश्न शासनाच्या विचाराधीन होते. यासर्व बाबींचा विचार करून शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

यासंदर्भात आता सांगोपांग विचार करून शासनाने प्रचलित अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या योजनेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार खालील सुधारणा प्रचलित योजनेत समाविष्ट करण्यात येत आहेत :-

१) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना नक्षलवादी/आतंकवादी/दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईत मृत्यू आल्यास अशा अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील व या प्रयोजनार्थ प्रचलित योजनेत विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये त्यांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.

२) गट अ/ब/क/ड मधील जे शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी/आतंकवादी/दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईमध्ये कायम स्वरुपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वतःहून शासकीय सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांतील एका व्यक्तीस वर विहित केलेल्या ५ टक्के मर्यादेमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी.

३) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरविलेल्या कुटुंबियांच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून त्यामध्ये घटस्फोटित/परीत्यक्ता/विधवा मुलींना/बहिणींना पात्र कुटुंबिय म्हणून समाविष्ट करण्यात यावे. मात्र, याबाबत मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पत्नी/पति ने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पति/पत्नी हयात नसल्यास त्याच्या/तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे.

वरील सुधारणा त्वरीत परीणामाने शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येत असून वरील सुधारणांव्यतिरिक्त अनुकंपा नियुक्तीच्या योजनेतील प्रचलित इतर तरतुदी यापुढेही कायम राहतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०७१७१५३४४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(श्री. प्र. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना.**
**प्रचलित कार्यपध्दती व योजनेच्या तरतूदीत**
**सुधारणा करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- अकंपा-१००७/प्र.क्र. १८१/०७/आठ**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- १ जानेवारी, २००८**

वाचा :- १) शासन निर्णय , सा.प्र.वि. क्र. अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ,
दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४
२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ,
दिनांक १२ मार्च, १९९७
३) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ,
दिनांक २८ मार्च, २००१
४) शासन निर्णय सा.प्र.वि.-अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२.८.२००५

**प्रस्तावना :-** शासन सेवेत असताना अचानक दिवंगत झालेल्या अथवा रूग्णतेच्या कारणास्तव (वर्गीत प्रयोजने) रूग्णता सेवा निवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे कुटूंब उघडयावर पडू नये यासाठी एक विशेष सवलत म्हणून अनुकंपा नियुक्ती देण्याच्या तत्कालीन प्रचलित योजनेत सुधारणा करून सुधारित योजना दि.२६.१०.१९९४ च्या शासन निर्णयाव्दारे कार्यान्वित करण्यात आली. त्यानुसार अनुकंपाधारकांना नियुक्ती देण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आले होते. नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडेच गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्तीसाठी प्रतिक्षासूची ठेवण्यात येत होती मात्र सर्वच कार्यालयात रिक्त पदे उपलब्ध होण्याचे प्रमाण आवश्यक त्या प्रमाणात नव्हते तसेच त्यात सुसूत्रता नव्हती, त्यामुळे जिल्हयातील सर्व कार्यालयातील अनुकंपा धारकांना नियुक्तीची संधी मिळण्यास विलंब होऊ नये, या कारणासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्हयातील सर्व कार्यालयातील अनुकंपा धारकांची गट 'क' व 'ड' ची स्वतंत्र परंतु सामायिक प्रतिक्षासूची ठेवावी व जिल्हयातील सर्व कार्यालयात उपलब्ध होणाऱ्या पदांवर संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या मागणीनुसार या सामायिक सूचीतील अनुकंपा धारकांची नियुक्ती करावी, अशा स्वरूपाची कार्यपध्दती दि.१२.३.१९९७ च्या शासन निर्णयाव्दारे विहित केली होती. त्यानंतर दि.२८.३.२००१ च्या शासन निर्णयानुसार गट 'क' व 'ड' मधील सेवेत असतांना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या पात्र कुटूंबातील एका पात्र व्यक्तीस त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्ती देण्याची तरतूद अस्तित्वात आली.

तद्नंतर सदर योजनेसंदर्भात सर्वांगीण विचार करून दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयान्वये गट 'क' व 'ड' मधील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५% पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्याचा निर्णय शासनाने जाणीवपूर्वक घेतला आहे.

प्रचलित योजनेनुसार अनुकंपा नियुक्ती ही रिक्त पदांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते व रिक्त पदांच्या उपलब्धतेअभावी पुरेशाप्रमाणात अनुकंपा नियुक्त्या करणे शक्य होत नाही. अनुकंपा नियुक्तीचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना असून ज्या कार्यालयांच्या आस्थापना लहान आहेत, अशा आस्थापनांवर प्रतिवर्षी गट 'क' व 'ड' मध्ये १० पेक्षा कमी संख्येने पदे रिक्त होतात व अशा कार्यालयात पुरेशा रिक्त पदांच्या अभावी अनुकंपा नियुक्त्या करणे शक्य होत नाही, कारण गट 'क' व 'ड' मधील रिक्त पदांच्या ५% पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्याच्या तरतूदीचे पालन करण्यासाठी त्यांच्या आस्थापनेवर गट 'क' व 'ड' मध्ये २० पदे रिक्त झाल्यास ०१ पद अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध होते. त्यामुळे ज्या आस्थापनांवर वर्षात २० पेक्षा कमी रिक्त पदे उपलब्ध होतील त्या आस्थापनांवर

५. सदर सुधारणा हया केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपुरत्याच सीमित असून त्या हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.२००८०१०११६५७४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सतीश त्रिपाठी)
अपर मुख्य सचिव (सेवा)
सामान्य प्रशासन विभाग

--------

**शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी कमाल वयोमर्यादेचा व टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्याचा निकष सुधारित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- अकंपा-१०१०/प्र.क्र. ३०८/१०/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ६.१२.२०१०

वाचा :
१. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ /आठ, दि.२३.८.१९९६
२. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१०९८/प्र.क्र.०५/९८ /आठ, दि.१०.३.१९९८
३. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/आठ, दि.२२.८.२००५
४. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा- १००७/१२९५/प्र.क्र.१८१/आठ, दि.२३.४.२००८
५. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. निवक- १०१०/प्र.क्र.०८/१६-अ, दि.६.१०.२०१०

__प्रस्तावना__ :- शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या प्रचलित अनुकंपा नियुक्ती योजनेमध्ये शा.नि.दि.२२.८.२००५ व दि.२३.४.२००८ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी कमाल वयामर्यादा ४० वर्षे इतकी विहित करण्यात आलेली आहे. या कमाल वयोमर्यादेच्या अटीमुळे प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांची नांवे नियुक्ती मिळण्यापूर्वीच वयोधिक्यामुळे वगळली जात असल्याने सदर वयोमर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतच्या प्रस्तावावर सर्वंकष विचार करुन अनुकंपा नियुक्तीच्या प्रचलित योजनेमधील नियुक्तीसाठी असलेल्या कमाल वयोमर्यादेची व टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासंबंधातील सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या तरतूदी अधिक्रमित करुन खालील प्रमाणे सुधारित तरतूदी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी या आधी असलेल्या ४० वर्षे या कमाल वयोमर्यादेत वाढ करण्यात येत असून ती आता वयाची ४५ वर्षे इतकी राहील.

२) अनुकंपा तत्त्वावर लिपीक- टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना टंकलेखनाचे विहित वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सध्या असलेली २ वर्षे ही मुदत कमी करुन ती आता नियुक्तीच्या दिनांकापासून ०६ महिने इतकी करण्यात येत आहे.

३) हे आदेश दि.६.१०.२०१० पासून लागू राहतील.

अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील यापूर्वी वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे उपरोक्त सुधारित तरतूदी या केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपूरत्याच सीमित आहेत. सदर तरतुदी या

जिल्हा परिषदा /नगर पालिका / महानगर पालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनांवरील कर्मचाऱ्यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१०१२०६१६४०२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( के.पी.बक्षी )
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

अनुकंपा नियुक्ती धोरणातील तरतूदीमध्ये
सुधारणा--विवाहित मुलीस अनुकंपा
नियुक्तीस पात्र ठरविणेबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांकः अकंपा १०१३/प्र.क्र.८/आठ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख: २६ फेब्रुवारी, २०१३.

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-१०९३/२३३५/ प्र.क्र.९०/ ९३/आठ, दिनांक २६/१०/१९९४

२) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-१०९५/ प्र.क्र.३४अ/आठ, दिनांक २३/८/१९९६

३) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा-१००६/ प्र.क्र. १७४/०६/आठ, दिनांक १७/७/२००७

प्रस्तावना —

संदर्भाधिन क्र.१च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीची सुधारित योजना अंमलात आली. अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबीयांमध्ये दिवंगत राज्य शासकीय कर्मचा-याची पती/पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी अथवा मृत्युपूर्वी कायदेशीररीत्या दत्तक घेतलेला/घेतलेली मुलगा/अविवाहित मुलगी, दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल व त्याच्या कुटुंबातील पात्र नातेवाईका व्यतीरिक्त अन्य कोणीही अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून, केवळ अविवाहित शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहीण, घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा मुलगी/बहीण ही नियमानुसार नेमणुकीस पात्र नातेवाईक मानण्यात

येतात. यानुसार कर्मचा-याची विवाहित मुलगी ही अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र समजण्यात येत होती. या संदर्भात श्रीमती अपर्णा झांबरे विरुध्द सहायक अधिक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ व इतर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई / मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अनुकंपा नियुक्तीसाठी विवाहित मुलीला पात्र ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय--**

दिवंगत राज्य शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबामध्ये फक्त विवाहित मुलगी हे एकमेव आपत्य असल्यास किंवा त्यांचे कुटुंब फक्त विवाहित मुलीवर अवलंबून असेल अशा प्रकरणी दिवंगत शासकीय कर्मचा-याची विवाहित मुलगी ही अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र राहील.

२) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना त्या उमेदवाराकडून (विवाहित मुलीच्या बाबतीत तिच्यासह तिच्या पतिकडूनही) दिवंगत शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबीयांचा तो/ती सांभाळ करील असे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र अनुकंपा तत्वावर एकदा नियुक्ती मिळाल्यानंतर तो/ती (उमेदवार) कुटुंबीयांचा सांभाळ करीत नसल्याचे आढळल्यास त्याची/तीची शासन सेवा तात्काळ समाप्त करण्यात यावी. तरी यासंदर्भात आवश्यक हमीपत्र (undertaking) नियुक्तीपूर्वी यापुढे उमेदवारांकडून स्टँप पेपरवर घेण्यात यावे.

अविवाहित मुलीला अनुकंपा नियुक्ती मिळाल्यानंतर तिचा विवाह झाल्यास विवाहाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत तिच्या पतिकडूनही तसे हमीपत्र घेण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२२६१६३३०६५३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांकः अकंपा १०१३/प्र.क्र.८/आठ

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्री. प्र. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांच्या मर्यादेत वाढ.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अकंपा -१०१४/प्र.क्र. ३४/आठ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १ मार्च, २०१४

**वाचा :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१००४/प्र.क्र. ५१/ २००४/आठ, दिनांक २२/८/२००५.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २२/८/२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट 'क' आणि 'ड' मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५ % पदांची मर्यादा विहीत करण्यात आली आहे. या मर्यादेमुळे अनुकंपाधारकांना प्रत्यक्ष नियुक्ती मिळण्यासाठी प्रदीर्घकाळ प्रतिक्षा करावी लागत असल्याचे आढळून आल्याने प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५ % पदांच्या मर्यादेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २२/८/२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट 'क' आणि 'ड' मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या ५ % मर्यादेमध्ये वाढ करुन ती **गट 'क' आणि 'ड' मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० %** इतकी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या वाढीव मर्यादेचा एक वर्षानंतर फेर आढावा घेण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३०११८१२२९९२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JOSHI ANIL D

Digitally signed by JOSHI ANIL D
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=JOSHI ANIL D
Date: 2014.03.01 18:19:38 +05'30'

अ. द. जोशी
अवर सचिव, महाराष्ट्र शासन